# अमृत कुंभ



वर्ष १३ । अंक ६ । फेब्रुवारी -मार्च २० । मूल्य रु. १३/-



चंद्रपूर : फरिश्ता भवनाचे उद्घाटन करतांना राजयोगिनी संतोष दीदी, कुसुम दीदी, कुंदा दीदी व ब्राह्मण परिवार



वरठी (भंडारा) : सेवाकेंद्राच्या रजत जयंती महोत्सवाचे प्रसंगी सत्कारमूर्ती राजयोगिनी रुक्मिनी दीदी, रजनी दीदी व अन्य मान्यवर



श्रीनगर (ठाणे) : ज्योतिष व वास्तुशास्त्राच्या आधारे, सदैव मानव सेवा करणारे भ्राता संदीप नेने यांना मानचिन्ह प्रदान करुन, सन्मानित करतांना संचालिका ब्र. कु. सीता दीदी



सांगवी (पुणे) : नवनिर्वाचित नगराध्यक्षा माई धोरे यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. संजीवनी दीदी



मालाड (मुंबई) : रस्ता सुरक्षा कार्यक्रमाचे प्रसंगी दीप प्रज्वलन करतांना ब्र. कु. कुंती दीदी, आर.टी.ओ. अधिकारी व अन्य मान्यवर



वर्धा : म. गांधीच्या विचारानुसार सामाजिक कार्य करणाऱ्या महान व्यक्तींना ईश्वरीय साहित्य भेट देतांना ब्र. कु. माधुरी बहेन



सातारा : 'हीलिंग गार्डन'चे अवलोकन करतांना आमदार श्री. महेश शिंदे, ब्र. कु. शिवानी बहेन, ब्र. कु. रुक्मिनी दीदी व अन्य



ठाणे (पू.) : विद्यासागर शिक्षण मंडळातर्फे राजयोगी भ्राता रतन दादा (लंडन) यांचा सत्कार करतांना आदरणीय वीणा भाटिया, ब्र. कु. लाजवंती बहेन, मीनाक्षी बहेन व अन्य.

परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १३, अंक ६. फेब्रुवारी – मार्च २०२०




१) 'स्व–चिंतन व प्रभु–चिंतनाने परचिंतन, घृणादृष्टी समाप्त करा' २

२) महिमा सारी एक परमात्मा शिव पित्याची (संपादकीय) ४

३) वाचकांशी हितगुज ७

३) अवतरले शिव पिता सर्वेश्वर (कविता) ७

४) समयानुसार आता बेहदचे वैरागी बना ८

५) विद्या विनयेन शोभते! ११

६) पवित्र दृष्टी १४

७) स्वर्ग रचयिता – परमात्मा शिव पिता (कविता) १५

८) मानव जीवनाचे लक्ष्य–प्रसन्नतेची प्राप्ती १६

९) संगमयुगी ब्राह्मण जीवनात प्राप्त करावयाच्या सोळा कला १९

१०) ब्रह्मावत्सांचे श्रेष्ठतम कर्तव्य २३

११) नैतिक शिक्षण हीच खरी काळाची गरज २६

१२) हिरेतुल्य संगमयुगात श्रीमतानुसार सर्वश्रेष्ठ आचारण करु या! २९


### मुखपृष्ठाविषयी

परमपिता शिव परमात्मा निराकार ज्योतिर्बिंदू स्वरुप आहे. परमधाम निवासी आहे. कल्पाचे अंती परमात्म्याचे दिव्य अवतरण प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात होते. त्यांच्या मुखकमलाद्वारे शिव परमात्मा राजयोग शिकवितात. त्याच्या अभ्यासानेच मानव, पावन देवी–देवता बनतो व भारतात पुन्हा स्वर्गाची स्थापना होते. याचेच गायन भक्तिमार्गात केले जाते – 'नर ऐसी करनी करे जो नर से श्रीनारायण बने और नारी ऐसी करनी करे, जो नारी से श्रीलक्ष्मी बने।' हाच भाव मुखपृष्ठावरील चित्रात अतिशय सुंदररीतीने दर्शविण्यात आला आहे.

त्रिकालदर्शी शिव परमात्म्याने हेही स्पष्ट केले आहे की प्रजापिता ब्रह्मा व मातेश्वरी मम्मा हेच सत्ययुगात विश्वमहाराजन् श्रीनारायण व विश्वमहाराणी श्रीलक्ष्मी बनतात. त्यामुळे आपणही आपले सद्भाग्य घडविण्यासाठी राजयोगाचा अभ्यास अवश्य करू या.

– प्रकाशक अमृतकुंभ

**फोटो, लेख आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंटस्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. शिवाजी चौधरी.

**वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या –** www.amrutkumbh.com.



# ‘स्व–चिंतन व प्रभु–चिंतनाने परचिंतन, घृणादृष्टी समाप्त करा’

**आदरणीय राजयोगिनी दादी जानकीजी**

**जीवनात यशस्वी होण्यासाठी, संघटनाची शक्ती वाढविण्यासाठी, भूतकाळातील घटना विसरून भविष्यात श्रेष्ठ प्रालब्धाचा अधिकार मिळविण्यासाठी सदैव स्व–चिंतन व प्रभुचिंतन करणे आवश्यक आहे. आत्मचिंतनानेच ईशचिंतन शक्य आहे.** परचिंतन करणे आणि परमात्म चिंतनात मग्न होणे यात जमीन–अस्मानाचे अंतर आहे. ब्रहमावत्सांसाठी तीव्र पुरूषार्थाच्या आड येणारे विघ्न म्हणजे परचिंतन करण्याची सवय.

**शिवबाबांच्या स्मृतीत राहण्याचा संकल्प करूनही, व्यर्थ गोष्टींकडे आकर्षून घेणारा वाचाळ स्वभाव आपला वैरी आहे. याउलट आत्मचिंतन केल्याने अर्थात ‘स्वदर्शन चक्रधारी’ बनल्यामुळे अवस्था योगयुक्त होते.** ‘मी शुद्ध, पवित्र आत्मा आहे’ ही स्व–स्वरूपाची ओळख प्रत्यक्ष आचरणात आणणाऱ्या वत्सांना बाबाही मदत करतात. योगबळाने प्रत्येक गोष्ट सहज होऊन जाते. रेसमध्ये धावणारे घोडे एकमेकांना बघत नाहीत. विजयी होण्याच्या एकमात्र निश्चयाने पुढे जात राहतात. आपणही सर्वगुणसंपन्न बनून शिवबाबांचं नाव मोठं करण्याच्या पुरूषार्थाची शर्यत करत आहोत. यासाठी परचिंतन, परनिंदेपासून अलिप्त राहून केवळ स्वतःवर पूर्ण लक्ष केंद्रित करणं अतिशय आवश्यक आहे. पण काळाच्या ओघात जर एखाद्याच्या मनात इतरांविषयी ईर्ष्या उत्पन्न झाली, भोवताली घडणाऱ्या घटनांनी त्याचा पुरूषार्थ प्रभावित झाला तर शिवबाबांच्या मदतीचा अनुभव येत नाही. अशी व्यक्ती कृपा, आशीर्वाद मागत रहाते. मग ‘का बरं मदत मिळत नाही?’ या विचारांनी उमंग उत्साह हळूहळू कमी होत जातो. कधीकधी मनातल्या विचारांचा वारू चौखूर उधळतो त्यावेळी असं का? कशासाठी? असा प्रश्नांचा आसूड उगारत राहिल्याने मन कधीच शांत होत नाही. तसंही आजकाल ओरडून कोणी सुधारत नाही. म्हणून मनरूपी घोड्याचा लगाम प्रेमाने आपल्या हातात ठेवावा. आत्म्याच्या शांत, पवित्र स्वधर्मात राहून आपल्या मन, बुद्धीला श्रीमताच्या मर्यादेप्रमाणे चालवावं.

वैश्विक सेवा असो, ईश्वरी कुटुंब म्हणून किंवा शिवशक्ती पांडव सेना म्हणून असो, ज्ञानमार्गात पुढे जाताना आपला एकमेकांशी मोठाच संबंध आहे. यात जर आत्मभाव, ईश्वरी स्नेह, विशाल बुद्धी, खरेपणा असेल, बाबा आणि बाबांच्या महावाक्यांचीच निरंतर स्मृती असेल तर विजय निश्चित आहे. ज्याचं एक बाबांवर प्रेम आहे त्या ब्रह्मावत्सामध्ये हे श्रेष्ठ गुण दिसून येतात. आयुष्यात आपल्याला अनेक छोट्या मोठ्या गोष्टींना सामोरं जावं लागतं. एखाद्या प्रसंगी ‘फार काही मोठी गोष्ट नाही’ असं म्हणता त्यासाठी स्वपुरूषार्थाचा अमूल्य वेळ दिला, संकल्प चालवले तर तसाच प्रसंग पुन्हा पुन्हा समोर येईल आणि छोटीशी बाब कधी मोठं रूप धारण करेल कळणार नाही. म्हणून फार सावधान असलं पाहिजे.

समोर आलेली परिस्थिती निरोप घेण्यासाठी येते तेव्हा धैर्याने, प्रेमाने ती हाताळा. आपण थोडं उदास झालो, चिडलो तर ती मोठं रूप धारण करेल. माया खास दोन रूपं घेऊन येते. एक घाबरवणारं आणि दुसरं आकर्षून घेणारं. म्हणून बाबा म्हणतात की निर्भय व्हा. मायेचं कितीही विक्राळ रूप समोर आलं तरी ‘मी या देहापासून निराळा आत्मा

आहे. सर्वशक्तिवान शिव परमात्मा माझा सोबती आहे’ ही स्मृती पक्की ठेवा. मग कोणत्याही व्यक्ती किंवा वैभवाच्या आकर्षून घेणाऱ्या रूपामुळे आपण मोहित होणार नाही. बुद्धीत निश्चय हवा की आपण भगवंताची लेकरं आहोत. त्याच्याप्रमाणे निरहंकारी, प्रिय बनायचंय म्हणून धारणेचाही अभिमान नको. नम्रतेने व्यवहार केला तर यश मिळतं. कोणाविषयी सूक्ष्म द्वेष किंवा घृणा जरी मनात असेल तर तो बाबांचा सुपात्र सेवाधारी ठरणार नाही. **घृणाभाव खूप नुकसान करतो. जसा उंदीर आधी फुंकर मारून मग चावतो जे कळतही नाही. त्याचप्रमाणे घृणादृष्टी आत्मभावात स्थिर राहू देत नाही. अशी व्यक्ती सतत एक दोघांना सांगत राहते ‘बघितलंत अमुक एक व्यक्ती कशी वागते? हे असं वागणं बरोबर नाही’ बुद्धीचा असा फेरा ना स्वतःला विनम्र, शांत, सुखी राहू देतो ना इतरांना सुख अनुभवू देतो.** ईश्वरी स्नेह जो आत्म्यामध्ये शक्ती भरतो त्याचीही अनुभूती होत नाही. बाबांची आपल्यासाठी शुभ आशा आहे की आता कोणताही अवगुण शिल्लक राहू नये.

ईश्वरीय कुटुंब जणू आरसा आहे. लहान सभेत (सेंटरवर) एकवेळ आपण निष्काळजीपणे वागू शकू. पण मधुबनमधील सभा हा असा आरसे महाल आहे जो काम, क्रोध, लोभ इ.अवगुणाचा अंश जरी शिल्लक असेल तरी त्याची जाणीव करून देतो. खूप मळलेल्या कपड्यावरचा मोठा डाग सहज लपून जातो. पण श्वेत वस्त्रावरील छोटासा डागसुद्धा उठून दिसतो. कलियुगी वातावरणात तमोप्रधान आत्म्याचे अवगुण झाकले जात होते पण आता संगमयुगात जेव्हा आपण पवित्रतेचा वसा घेतो तेव्हा विकाराचा अंशमात्रही मोठा जाणवतो. आता संपूर्ण परिवर्तन कसं शक्य आहे? त्यासाठी आत्मचिंतन व प्रभुचिंतनाची आवश्यकता आहे. मनापासून स्वच्छता आणि खरेपणाची कास धरली की आत्मा शुद्ध, पवित्र होऊन परमात्म्याचं प्रेम व शक्ती खेचून घेऊ शकतो. ज्याला स्वपरिवर्तनाची तीव्र इच्छा आहे तो प्रत्येक गोष्ट योग्य पद्धतीने सुधारत जाईल. कोणी एका महिन्यात करेल तर कोणाकडून वर्षानुवर्ष प्रयत्न करूनही साध्य होत नाही. यासाठी हवी विशाल बुद्धी.

तीव्र पुरूषार्थी कोणत्याही जुन्या. परक्या वस्तू किंवा व्यक्तीच्या संबंधांमध्ये ममत्व ठेवणार नाही. मायेच्या प्रभावाखाली असलेल्या व्यक्ती आणि वैभवाला आपलं समजून वागणं ही एक प्रकारची चोरीच नाही का? अशा ठिकाणी आपली प्रीत कधीच नसावी. त्यास स्पर्श करून पाहण्याचीही इच्छा असता कामा नये. एवढी पवित्रता आपल्या धारणेत हवी. पण सूक्ष्म रूपात कोणाविषयी घृणाही असू नये. आत्मभावात आनंदी राहण्याची, सर्वांबरोबर ईश्वरी स्नेह, सौहार्दाने वागण्याची सवय केली पाहिजे. ज्ञान, समजूतदारपणा, सत्यता आणि आत्मिक प्रेम जे माझ्याकडे आहे तेच इतरांच्या संबंध संपर्कात येतानाही असावं. म्हणजे सहज अविनाशी प्राप्ती होत राहील.

माझ्या मनात कोणत्या प्रकारचे विचार येतात? मी आत्मा व्यर्थ चिंतनाच्या जाळ्यात फसत तर नाही ना? होतं काय की मायाजालात गुंतल्यामुळे एकाचा विचार बाजूला सरत नाही तो दुसऱ्याचा विचार सतावतो.मग तिसऱ्याचा, व्यर्थ चिंतनाला अंत नसतो. शांतचित्ताने जरी शिवबाबांना आठवायला सुरवात केली तरी त्याच व्यक्ती डोळ्यासमोर येत राहतात. असा स्वतःच स्वतःचा शत्रू कधीही बनू नका. वृथा देहाभिमान सोडून स्वतःला आत्मा निश्चय करून वागण्याची सवय झाली की बाबांशी सूक्ष्म संबंध सदैव जोडलेला असेल. आपली बुद्धी स्वच्छ असेल, मन साफ असेल तेव्हाच आपण स्वतःला पाहू शकतो. आपल्या संपूर्ण स्वरूपाचं आवाहन करून श्रेष्ठ पद प्राप्त करू शकतो. **अमृतवेळेपासून दिवसभर जर शिवबाबांची मधुर महावाक्यं स्मृतीत ठेवली तर संगमयुगातील हे क्षण आपलं सर्वोच्च भाग्य बनवतील. मनापासून प्रामाणिकपणे पुरूषार्थ करणाऱ्या ब्रहमावत्सांना सतत शिव बाबा आणि श्रीमत आठवत राहील. म्हणूनच परचिंतनाला हद्दपार करून नेहमी आत्मचिंतन करू या. शुभचिंतनाची ज्योत जागवू या.**

संदर्भ : ‘ज्ञान सरिता – भाग ६’

भावानुवादः ब्र.कु.मीनल, ठाणे (पश्चिम)

***



(संपादकीय)

# महिमा सारी एक परमात्मा शिव पित्याची, तोचि कल्पांती, करी सद्गती, सर्व आत्म्यांची

(महाशिवरात्री निमित्त)

महिमा सारी एक परमात्मा शिव पित्याची (शिवबाबांची) आहे. दुसऱ्या कुणाचीही नाही. लक्ष्मी-नारायण, राम-सीता आदि कुणाची नाही. कारण तोच कल्पाच्या अंती सृष्टीवर अवतरित होऊन, ब्रह्मामुखाद्वारे सत्य गीता ज्ञान देतो, ज्याद्वारेच मानव पुन्हा देवता बनतो. म्हणूनच शिव परमात्म्याला देवांचाही देव, महादेव असे म्हटले जाते. तोच पतित-पावन, ज्ञानाचा सागर, पवित्रता, सुख-शांतीचा सागर, संपत्तीचा सागर, सर्व आत्म्यांचा सद्गती दाता, जगत् पिता, जगत शिक्षक, जगत गुरु, मुक्ती व जीवनमुक्तीचा वारसा देणारा आहे. शिव परमात्म्याचे गायन व पूजन केले जाते. याचा अर्थ तो जरुर शरीराद्वारे कर्तव्य करतो म्हणूनच त्याचे गायन आहे.

**आपणा सर्वांना हे जाणून अतिशय आनंद होईल की निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात सन १९३६ मध्ये झाले आहे. त्यामुळे यावर्षी आपण ८४ वी महाशिवरात्री अथवा शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी करीत आहोत.**

**सत्यम्, शिवम्, सुंदरम् -**

परमात्मा शिव पित्यालाच सत्यम्, शिवम्, सुंदरम् असे म्हटले जाते. सत्य एक शिवबाबांनाच म्हटले जाते. तोच सत्य गीता ज्ञान देतो. म्हणूनच संगमयुगात पुरुषोत्तम बनण्याचा एकच सत्संग असतो. याचेच गायन केले जाते. 'संग तारे, कुसंग बोरे' (कुसंग अर्थात रावणाचा संग). **शिवबाबाच सत्य बाप, सत्य टीचर व सत्य गुरु आहेत. तोच सर्वाधिक उच्च एक भगवान आहे. तोच भारतात पुन्हा सच खंड (अर्थात स्वर्ग) स्थापन करतो. म्हणूनच त्याला स्वर्गाचा रचयिता (Heavenly God Father) असे म्हटले जाते.** तोच मनुष्य सृष्टीचा बीजरुप आहे. सत्-चित्-आनंद स्वरुप आहे. तो देखील आत्मा आहे परंतु परम आहे. सर्व आत्म्यांचा पारलौकिक पिता आहे.

लौकिक दुनियेत मनुष्य तर बॅरिस्टर, इंजीनियर आदी बनतात. परंतु मनुष्याला देवता बनविणे, हे परमपिता परमात्मा, ज्ञानसागर शिवबाबांचे कर्तव्य आहे. तोच एक सत्य बोलणारा आहे. त्याच्या श्रीमतानुसार आचरण केल्यानेच आपण श्रेष्ठ बनतो. सत्ययुगात श्रीलक्ष्मी-नारायणाचे राज्य होते. त्यांना हे राज्यभाग्य जरुर सत्ययुग स्थापन करणाऱ्या परमात्मा शिव पित्याकडूनच प्राप्त झाले होते.

शिवबाबाच सदा सुंदर आहेत. तेच संगमयुगात आत्म्यांनाही सुंदर बनवितात. पावन आत्म्यांना सुंदर म्हटले जाते व पतित आत्म्यांना काळे म्हटले जाते. स्वर्गात नॅचरल ब्युटी (नैसर्गिक सौंदर्य) असते. आत्मा सत्त्वप्रधान असल्याने शरीरसुद्धा सत्त्वप्रधान असते. आता आपण पुन्हा सत्त्वप्रधान बनण्याचा पुरुषार्थ करीत आहोत. आपण ब्रह्मावत्सच स्वर्गाचे मालक बनतो. म्हणूनच गायन केले जाते - **'मातायें स्वर्ग का द्वार खोलती है।' कारण ब्रह्माकुमारी (माता व भगिनी) याच सर्वांना स्वर्गाचे द्वार दाखवतात. सर्वांना ईश्वरीय ज्ञान देण्यासाठी निमित्त बनतात.** म्हणूनच 'वंदे मातरम्' असेही गायन केले जाते.

**ज्ञानेश्वर शिव परमात्मा**

शिव परमात्म्यालाच ज्ञानेश्वर असे म्हटले जाते. ज्ञानेश्वर अर्थात ज्ञान देणारा ईश्वर. ज्ञानानेच सद्गती होते.

ज्ञान-ज्ञानेश्वर आपल्याला ज्ञान देतो. त्याच्या आधारेच आपण भविष्यात राज-राजेश्वर बनतो. म्हणूनच परमात्मा जे ज्ञान देतात, त्याला राजयोग म्हटले जाते. ज्ञानेश्वर अर्थात ईश्वर जो ज्ञानाचा सागर आहे, तो आपल्याला सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान देतो. त्याद्वारे आपण स्वदर्शन चक्रधारी बनतो. हे ज्ञान धारण केल्यानेच आपण भविष्यात राजांचे ही राजा, महाराजा बनतो.

**परमपिता शिव परमात्म्याच ज्ञानाचा सागर आहे. परंतु शास्त्रात असे लिहिले आहे की चिमण्यांनी सागर गिळंकृत (हप) केला. वास्तविक चिमण्या थोडेच असे करु शकतील. चिमण्या तर ब्रह्माकुमारींचे (माता व भगिनींचे) प्रतीक आहे. ज्यांनी ज्ञानसागराला पूर्णतः गिळंकृत केले** अर्थात शिवबाबांकडून वारसा प्राप्त करून सर्व काही मिळविले. सर्व खजिने प्राप्त केले. सर्व रत्ने मिळविली. शिवबाबांसाठी राजाई वगैरे काहीच ठेवलं नाही. जणू संपूर्ण सागरच चिमण्यांनी गिळंकृत केला असे गायन आहे.

शिवबाबा नॉलेजफुल आहे अर्थात ज्ञानाचा सागर आहे. साऱ्या सृष्टीच्या आदि, मध्य, अंताचे ज्ञान त्याच्यात आहे. जसे बीजामध्ये झाडाचे ज्ञान असते ना! परंतु ते बीज जड आहे. त्यामुळे सांगू शकत नाही. शिवबाबा मात्र मनुष्य सृष्टीच्या झाडाचे चैतन्य बीज आहेत. ते आपल्या मुलांनाही नॉलेज देऊन नॉलेजफुल बनवितात. आपणसुद्धा हे ज्ञान अनेकांना दिले पाहिजे. हे नॉलेज धारण केल्यानेच आपल्याला विश्वाची बादशाही प्राप्त होणार आहे.

**ज्ञानसूर्य शिवबाबा -**

आता आपल्याला (ब्रह्मावत्सांना) सृष्टिचक्राचे ज्ञान प्राप्त झाले आहे. परंतु अन्य सर्व मनुष्य अज्ञान अंधःकारात आहेत. म्हणूनच गायन केले जाते. 'ज्ञान सूर्य प्रगटा, अज्ञान अंधेरा विनाश' ज्ञानसूर्य एक शिवबाबा आहे. सत्ययुग, त्रेतायुगाला (ब्रह्माचा) दिवस म्हटले जाते. तसेच द्वापरयुग, कलियुगाला (ब्रह्माची) रात्र असे म्हटले जाते. दिवसाचे रात्रीत परिवर्तन रावण करतो व रात्रीचे पुन्हा दिवसात परिवर्तन राम करतो. राम निराकार शिवबाबांना म्हटले जाते. संगमयुगात आपण लकी सितारे, ज्ञानसूर्य शिवबाबांच्या सन्मुख बसून, राजयोगाचे शिक्षण प्राप्त करतो. फलस्वरुप आपणसुद्धा नॉलेजफुल बनतो.

**पतितपावन शिव परमात्मा -**

कल्पांती अर्थात कलियुगाचे अंती संपूर्ण मनुष्यसृष्टी विकारी पतित बनते. तिला पुन्हा पावन बनविण्यासाठी पतितपावन शिव परमात्म्याचे या सृष्टीवर अवतरण होते व त्यांनी शिकविलेल्या राजयोगाच्या आधारे पतित मनुष्यात्मा पुन्हा पावन बनतो. म्हणूनच शिव परमात्म्याला पापकटेश्वर, मुक्तेश्वर, सद्गतीदाता, लिबरेटर, गाईड अशी अनेक कर्तव्यवाचक नावे आहेत. तोच मनुष्यात्म्यांना पावन बनवून भविष्यात देवी-देवता बनवतो (म्हणूनच भारतात ३३ कोटी देवी-देवतांची मान्यता आहे). तात्पर्य म्हणजे पतितपावन केवळ एक शिव परमात्मा आहे. अन्य कोणीही नाही. तोच सर्व आत्म्यांचा पिता व सद्गतीदाता आहे. तो निराकार, ज्योतिर्बिंदू स्वरुप आहे. अन्य धर्मात त्यालाच ॐकार, अल्लाह (नूर), गॉड, जेहोवा इत्यादी नावांनी संबोधले जाते.

**या अनुषंगाने पतितपावन शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये सदैव लक्षात ठेवा, ''मीठे बच्चे, काम विकार ही महाशत्रू है। यह तुमको आदि-मध्य-अन्त दुःख देता है। विकार में जानेवाले को ही पतित कहा जाता है। अब बाप तुम्हे श्रीमत देते है, अपने को आत्मा समझ, अपने बाप पतितपावन को याद करो तो तुम पावन बन जायेंगे।** कोई भी मनुष्य, मनुष्य को पावन बना नही सकते है। पतितपावन एक ही बाप है। मेरे को कहते ही है शिवबाबा, मेरा पार्ट ही है पतितों को पावन बनाने का।''

**त्रिमूर्ती शिव भगवान -**

परमात्मा शिव हेच ब्रह्मा, विष्णु व शंकर या तिन्ही देवतांचे निर्माते आहेत. म्हणूनच त्यांना त्रिमूर्ती शिव भगवान असे म्हटले जाते. ते ब्रह्माद्वारे

नवीन दुनियेची स्थापना, शंकराद्वारे कलियुगी पतित दुनियाचा महाविनाश आणि विष्णुद्वारे नव विश्वाचे पालन करवून विश्वाचे कल्याण करतात. याचेच प्रतीक म्हणून शिवलिंगावर त्रिपुंड लावले जाते व मध्यभागी लाल टिळा लावला जातो. त्याचबरोबर भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वर एक प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे (नाशिकपासून ३० कि.मी. अंतरावर) या शिवलिंगाची विशेषता म्हणजे त्याच्यावर तीन मुख आहेत. हे तीन मुख – ब्रह्मा, विष्णु व शंकर यांचे प्रतीक आहेत. तात्पर्य म्हणजे परमात्मा निराकार शिव आहे, जो या तिन्ही देवांचा रचयिता आहे. म्हणूनच भक्तिमार्गात ब्रह्मा देवताय नमः, विष्णु देवताय नमः, शंकर देवताय नमः व शेवटी शिव परमात्माय नमः असे गायन करतात.

**सर्वांचा सद्‌गतीदाता–एक शिव पिता –**

परमात्मा शिव पिता आता आपल्याला रचयिता व रचनेच्या आदि–मध्य–अंताचे ज्ञान प्रदान करतात. या ज्ञानानेच सर्वांची सद्‌गती होते. हे ज्ञान अन्य कोणीही देऊ शकत नाही. **वास्तविक आपण सर्व आत्मे एक परमात्मा शिव पित्याची मुले आहोत. परंतु आपण आपल्या पारलौकिक पित्याला व त्याच्या कर्तव्याला जाणत नसल्याने, आपापसात लढत रहातो. परिणामतः पतित, दुःखी व निधनचे बनतो.** या अनुषंगाने पुढील ईश्वरीय महावाक्ये अतिशय उद्‌बोधक आहेत – **''शिवबाबा को तो कोई जानते ही नही है। सद्‌गति करनेवाला तो वो ही है। सर्व का सद्‌गतिदाता एक ही बाप है जो कि स्वर्ग की स्थापना करते है।** बाप के सिवाय कोई पावन नही बना सकते है।''

**शिव भोला भंडारी –**

भोलानाथ शिवबाबा भोला भंडारी आहे. भोला भंडारी अर्थात भंडारा भरपूर करणारा. कोणता भंडारा? धन, दौलत, सुख, शांती, आनंद, प्रेम, पवित्रता इत्यादी. शिवबाबा अवतरित झालेच आहेत मुळी पवित्रता, सुख, शांतीचा भंडारा भरपूर करण्यासाठी. कलियुगात पवित्रता, सुख, शांतीचे दिवाळे निघाले आहे. कारण रावणाने श्राप दिला आहे. (रावण हे पाच विकारांचे प्रतीक आहे) परिणामतः दुनियेतील सर्व मानवमात्र शोकवाटिकेत रडत आहेत अर्थात दुःख भोगत आहेत, सारी सृष्टी नर्कतुल्य बनली आहे. या सृष्टीवर पुन्हा स्वर्ग स्थापन करण्यासाठी, सर्वांचे भंडारे भरपूर करण्यासाठी, सर्वांना सद्‌गती देण्यासाठी परमात्मा शिव पित्यांचे दिव्य अवतरण कल्पाचे अंती आता झाले आहे. म्हणूनच आपण ही महाशिवरात्री मोठ्या उत्साहाने व अत्यानंदाने साजरी करु या. आता संगमयुगाचा अतिशय थोडा काळ बाकी आहे. संगमयुगातच आत्म्याचे मीलन परमात्मा शिव पित्याशी होते. याचेच गायन केले जाते.

**आत्मा परमात्मा अलग रहे बहुकाल। सुंदर मेला कर दिया, जब सद्‌गुरु मिला दलाल।।**

तात्पर्य म्हणजे भाग्यविधाता शिव परमात्मा आपल्याला २१ जन्मांचे अविनाशी भाग्य प्रदान करण्यासाठी अवतरित झाले आहेत जे प्राप्त करण्याचा आधार, संगमयुगतील आपला पुरुषार्थ आहे. त्यामुळे आता श्रीमतानुसार तीव्र पुरुषार्थ करा.

भक्तिमार्गात शंकराला भोला भंडारी असे म्हटले जाते. परंतु शंकराला भोला म्हणता येणार नाही कारण त्याने तिसरा नेत्र उघडताच सृष्टी भस्म झाली असे गायन आहे. शंकराचे कर्तव्य आहेच मुळी कलियुगी पतित सृष्टीचा महाभारी विनाश करणे. त्यामुळे भोलानाथ शिवबाबांना ओळखा. त्यांची वारस मुले बना. म्हणजे तुमचे सर्व भंडारे भरपूर होतील.

**सुखदाता, प्रेमाचा सागर शिवबाबा –**

भक्तिमार्गात आपण निरनिराळ्या देवी–देवतांची पूजा करतो. परंतु आपल्या या भक्तीचे फळ मात्र परमात्मा शिव पिताच देत असतो. अन्य कोणीही सुख देऊ शकत नाही. सुखदाता केवळ एक शिवबाबाच आहे. तोच सर्वांना सुख देतो. **आता संगमयुगात आपण सुखदाता, प्रेमाचा सागर शिवबाबांची मुले बनलो आहोत. त्यामुळे आपले आचरणसुद्धा बापसमान सुखदायी व प्रेमपूर्ण असले पाहिजे.** तरच आपल्याद्वारे परमात्मा पित्याची प्रत्यक्षता

होईल. त्यासाठी देह-अभिमान सोडून, आत्म-अभिमानी बनले पाहिजे व सदैव शिवबाबांच्या मधुर स्मृतीत राहिले पाहिजे. फलस्वरुप आपण पद्मापद्म भाग्यशाली बनू.

यावरुन आपल्या लक्षात आले असेल की ज्ञानाचा सागर, पतितपावन, स्वर्गाचा रचयिता, लिबरेटर, गाइड एक परमात्माच आहे. त्याची महिमा अपरंपार आहे. म्हणूनच गायन केले जाते - 'धरती को कागज बनाओ, सागर को श्याही बनाओ, जंगल को कलम बनाओ, तो भी उसकी महिमा लिखी न जाये।'

**शेवटी आपणा सर्वांना ८४ व्या महाशिवरात्रीच्या वा त्रिमूर्ती शिवजयंतीच्या पद्मापद्म मंगलकामना! तसेच त्यानिमित्ताने विश्वाच्या कानाकोपऱ्यात शिवबाबांचा झेंडा फडकवू या व अत्यानंदे महाशिवरात्री साजरी करु या.**

**- ब्र. कु. शिवाजी**

---

## वाचकांशी हितगुज

- **अमृतकुंभ व अमृतकलश या दोन्ही द्वैमासिकांचा विचार करता सन २०२०-२१ हे मराठी द्वैमासिकाचे ३६ वे वर्ष आहे. आतापर्यंत वाचकांनी अतिशय बहुमोल असा प्रतिसाद दिला आहे. त्याबद्दल सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद!** यापुढेही आपल्याकडून असाच वाढता प्रतिसाद अपेक्षित आहे. अर्थातच तो असाच मिळत राहिल याची खात्री आहे. अमृतकुंभ द्वैमासिक मराठी भाषिक बांधवांच्या घराघरापर्यंत पोचविण्यासाठी आपण सहकार्य करावे.
- वाचकांनी तसेच सेवाकेंद्राच्या निमित्त टीचर बहिणींनी एप्रिल २०२० पासून सुरु होणाऱ्या, नवीन वर्षाच्या 'अमृतकुंभ' ची मागणी फेब्रुवारी २०२० अखेरपर्यंत कृपया कळवावी. म्हणजे त्यानुसार अंक छापणे सुकर होईल. मागील वर्गणी काही थकीत असल्यास, ती सत्वर पाठवावी.
- **मुख्य म्हणजे पुढील वर्षाची वर्गणी सध्या इतकीच रु.७५/- व आजीव सभासद वर्गणी रु.१४००/- इतकी राहिल, याची नोंद घ्यावी.** तसेच वर्गणीची रक्कम लवकरात लवकर 'प्रकाशक अमृतकुंभ' यांच्या पत्त्यावर पाठवावी. त्याचबरोबर डिमांड ड्राफ्ट पाठवितांना तो 'अमृतकुंभ, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' या नावानेच पाठवावा.
- आपले ज्ञानमार्गातील विशेष अनुभव, लेख, कविता तसेच अमृतकुंभाविषयी काही विधायक सूचना असल्यास त्या अवश्य कळवाव्यात. पाठविलेल्या साहित्याची गुणवत्ता पाहून, ते प्रकाशित करण्यात येईल

**- प्रकाशक, अमृतकुंभ**

## अवतरले शिव पिता सर्वेश्वर

शिवरात्रीच्या शुभ पर्वावर,
अवतरले शिव पिता सर्वेश्वर ।।धृ।।

आत्मा अनुभवी दुःख, अशांती।
त्यातूनी देण्या तयास मुक्ती।
संगमयुगी पहा प्रगटले,
करुणासागर शिव मुक्तेश्वर।।१।।

मूळचाच हा, पावन आत्मा।
विषया संगे, होई पापात्मा।
पाप तयाचे निवारण्यासी,
धावूनी आले, पाप कटेश्वर।।२।।

निराकार साकार होतसे।
ब्रह्मातन आधार घेतसे।
नवयुगाच्या निर्माणास्तव,
अवतीर्ण झाले त्रिभुवनेश्वर ।।३।।

कधी गोपेश्वर, कधी रामेश्वर।
होऊनी आले, शिव या भूवर।
स्मृती शिवाची हर्षोल्लासे,
करु साजरी, आज घरोघरी।।४।।

(संदर्भ : ब्र. कु. गौतम सुत्रावे यांनी लिखित काव्यसंग्रह 'ज्ञानसुधा ही शिवबाबांची')



# समयानुसार आता बेहदचे वैरागी बना

**ब्र. कु. सूर्य भाई (माउंट आबू)**

या भूतलावर एक दिवस असा येईल जेव्हा चहू बाजूंना वैराग्याचं वातावरण पसरेल. प्रत्येकाच्या मनात सामावलेली आसक्ती या वैराग्य अग्निमध्ये जळून भस्म होईल. क्षणिक सुख मिळवण्यासाठी सुरू असलेली धावाधाव शांत होईल आणि प्रत्येक मनुष्यात्म्याला विषय वासनांच्या नश्वरतेची जाणीव होईल. तेव्हा सर्वजण ईश्वरी मार्गाचे अनुसरण करू लागतील आणि आपल्या परमपिता परमात्म्याकडून मुक्ती व जीवनमुक्तीचा वारसा प्राप्त करण्यासाठी उत्सुक असतील.

परंतु हे सर्व कधी व का घडेल? आपण जाणतो की वैराग्यावाचून संपूर्णता प्राप्त होणार नाही. याचं कारण म्हणजे विविध प्रकारच्या आसक्तींमुळे मानवाची बुद्धी भरकटते. जोपर्यंत बुद्धियोग स्थिर होत नाही तोपर्यंत विकर्म विनाश होत नाही व आत्म्याला त्याच्या श्रेष्ठ लक्ष्याची प्राप्तीही होत नाही. अल्पावधीतच निसर्गाचा प्रकोप विनाशाचे तांडव नृत्य करू लागेल तेव्हा. न जाणो कधी या संसारचक्रातून निघून जावे लागेल अशी भावना माणसांच्या मनात भरून राहील. धन संपत्ती, वैभव, मानवी नाती तसंच समाजातील पद यापैकी काहीही आधार देऊ शकत नाहीत ही जाणीवच त्यांच्या बुद्धीला खऱ्या आधाराकडे खेचून घेईल. प्रसंगानुरूप आलेलं वैराग्य त्या प्रसंगाचं परिवर्तन झालं की लोप पावतं, म्हणूनच योगयुक्त राहणाऱ्या व्यक्तींचं वैराग्य हे घटनांवर आधारलेलं नसून ते ज्ञानयुक्त व अनुभवावर टिकलेलं असतं. अशा महान योगीजनांचं वैराग्यच जगात वैराग्याचं वातावरण पसरवेल.

**सृष्टिचक्राच्या अंतिम टप्प्यावर सगळ्यांनाच विरक्ती येत असली तरी त्यावेळी पुरूषार्थासाठी अधिक वेळ मिळणार नाही. भय आणि अशांतीच्या वातावरणात तीव्र गतीने साधना करणं अशक्य होईल. त्या क्षणी वैराग्य आल्याने फारसा फायदा होणार नाही. म्हणूनच वेळेआधी धारण केलेल्या वैराग्याचं खरे महत्व आहे.** तात्पर्य म्हणजे समयानुसार आता बेहदचे वैरागी बना.

**आसक्तीची कारणं :**

भोवताली नजर टाकली तर दिसून येतं की प्रत्येक मनुष्य कुठे ना कुठे आसक्त वा गुंतलेला आहे. संपूर्ण कलियुगी वातावरणाच्या प्रभावामुळे ज्ञानी योगीजनसुद्धा कधीतरी आसक्त होतात. कुणी वैभव सुखांची तृप्ती भोगतोय, तर कुणी मानवी प्रेमालाच सर्वस्व समजतोय. कुणी मान सन्मान प्राप्त करण्यासाठी धावतोय, तर कुणी अल्पकाळाच्या प्राप्तीलाच सुखाचं साधन मानतोय. परंतु ही आसक्ती मानवाला संपूर्ण समाधान देऊ शकत नाही. आज सुख तर उद्या दुःख अनुभवाला येतं.

अशी ही आसक्ती वाढण्याचं कारण काय? माणसाचं वाढतं देहभान. शरीराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याने तन, मन, धन व शक्ती कार्यात लावली व याच संसारसुखाच्या प्राप्तीला सर्वस्व मानण्याच्या चुकीमुळे त्याची आसक्ती वाढू लागली. असं असूनही कित्येक जण मानतात की ज्यांच्यासाठी दिवसरात्र मेहनत घेतली ते वेळेवर मदतीला आले नाहीत.

अशाचप्रकारे 'माझं-माझं' म्हणण्याची वृत्तीसुद्धा आसक्ती उत्पन्न करते. मानवी देहामध्ये गुंतलेल्या मनात

आसक्ती जागृत होते. त्याचप्रमाणे पदार्थ व वैभव उपभोगण्याचे आकर्षण तसेच अनेक इच्छा आकांक्षाही आसक्तीला जन्म देतात. अशावेळेस योगी आत्म्यांनी सावध राहून स्वतःवर लक्ष केंद्रित केलं पाहिजे. जीवनाचं महान लक्ष्य व ईश्वरी सुखांच्या प्राप्तीचं महत्त्व विसरून आपण कुठे आसक्त तर झालो नाही ना. याविषयी जागरूक असलं पाहिजे. कारण एकदा निर्माण झालेली आसक्ती पुन्हा वैराग्यात बदलण्यासाठी पुष्कळ कालावधी लागतो.

वैराग्य तीन प्रकारचे असते. सतो (सत्त्व) रजो व तमो. वैराग्य हे संन्यास्यांनाच येतं असं बहुतेकांना वाटत असतं. परंतु गृहस्थ जीवनात राहूनही वैराग्याची धारणा करणं हीच ईश्वरी ज्ञानाची विशेषता आहे.

• **सतोप्रधान (सत्त्वप्रधान) वैराग्य** : ज्ञानयुक्त होऊन महान लक्ष्य प्राप्त करण्यासाठी धारण केलेलं वैराग्य स्थायी राहत असून त्यात आसक्ती नसते. कधी आसक्ती वाटलीच तरी लवकरच त्याला वैराग्यात परिवर्तन करण्याची विशेषता यात असते. उदाहरणार्थ प्रजापिता ब्रहमाबाबा व काही योगी सत्पुरूषांनी धारण केलेले वैराग्य सतोप्रधान होते.

• **रजोप्रधान वैराग्य** : काही घटना प्रसंग पाहून आलेलं वैराग्य ज्यात कालांतराने आसक्तीचा भाव उत्पन्न होऊ शकतो. काहीजण महात्मा बुद्धांच्या वैराग्याला रजोप्रधान मानतात परंतु वैराग्य येण्यासाठी त्यांच्या आयुष्यातील त्या घटना केवळ निमित्तमात्र ठरल्या. वैराग्याचे बीज तर त्यांच्या मनात आधीपासूनच होते. त्यामुळे अशा वैराग्याला प्रथम श्रेणीचेच मानावे लागेल.

• **तमोप्रधान वैराग्य** : कौटुंबिक कलह, दुःखद घटना, आपसातील संघर्ष, प्रियजनांचा मृत्यू इ. कारणांनी कंटाळून अनेकांना वैराग्य येते व ते संन्यास घेतात. परंतु कालांतराने कित्येकांना पश्चात्ताप होऊन, आसक्ती वा लोभाने पुन्हा संसार सुखांकडे वळलेले आपण पाहतो.

सामान्यपणे अशी मान्यता आहे की वैराग्य आल्याने मानवाचे जीवन शुष्क बनते. विवेकयुक्त वैराग्याची धारणा न केल्याने, ईश्वरीय सुखांच्या अनुभवात रममाण न झाल्याने आयुष्य निरस वाटते. असं असेल तर त्या वैराग्याला काही महत्त्व नाही. ज्या ब्रह्मावत्सांना ईश्वरीय ज्ञानाची समज आहे त्यांनी ज्ञानयुक्त वैराग्य धारण केलं पाहिजे. जेणेकरून ते स्थायी व सुखकर असेल. तरच जीवन ईश्वरीय अनुभवांनी समृद्ध बनेल.

**प्रजापिता ब्रहमाबाबांचं वैराग्य :**

ईश्वरी अनुभूती व सृष्टिचक्राच्या समाप्तीच्या ज्ञानाने ब्रहमाबाबांच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले. जे शेवटपर्यंत ३३ वर्षे अखंड एकरस राहिले. विषय पदार्थांच्या आसक्तीपासून पूर्णपणे विरक्त, दैहिक नातेसंबंधांच्या स्मृतीतून मुक्त, सर्वकाही विश्वसेवेसाठी अशी सात्विक वैराग्याची परिसीमा गाठणारे ब्रहमाबाबा आपल्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत. या वैराग्यामुळेच साऱ्या विश्वाला योगबळाची शक्ती देणारे महान तपस्वी म्हणून ते आजही वंदनीय आहेत.

**त्याग व तपस्येचा आधार वैराग्य :**

जीवनात ज्याला खरी विरक्ती आली त्या मनुष्याला काहीही त्याग करण्यात मेहनत वा संकोच वाटत नाही. त्याग मग तो लहान असो किंवा मोठा. मान-सन्मानाचा विषय असो किंवा धन वैभव त्यागणं असो. अशा व्यक्तीला कधीही अहंकार स्पर्श करत नाही. असा त्यागाचाही त्याग करणारा वैराग्य वृत्तीचा योगी सर्व बंधनांपासून मुक्त होत जातो. त्याच्या मनातल्या संकल्पांची गती मंदावते, व्यर्थ विचारांचा कल्लोळ शांत होतो. तपस्येचं मधुर फळ एकरस स्थिती व सुखाची अनुभूती करताना तो एक महान योगी आत्मा बनतो.

ब्रहमावत्सांनो, आपण धारण केलेलं वैराग्य बेहदचं असीमित आहे. सर्वस्वाचा त्याग करून आपल्याला परमधामात परतायचं आहे. तेव्हा सहजपणे स्वतः सगळयाचा त्याग करून विनाविलंब आत्मा प्रस्थान करेल. परंतु जो मानव खूप आसक्त असेल त्याला मात्र सर्वाधिक त्रास भोगावा लागेल. विश्व परिवर्तनाच्या कार्यात महान

भूमिका साकारण्याची तुमची इच्छा असेल तर आतापासूनच आसक्तीला पूर्णविराम दया. राजयोगी बना. तरच तुम्ही महादानी बनून विश्व कल्याणाचे श्रेष्ठ कार्य करू शकाल.

**मुख्यत्वे ५ गोष्टींचे वैराग्य हवे :**

**• विषय विकारांपासून वैराग्य :**

जन्म जन्मांतर आपण मनुष्यात्मे दैहिक विषय सुखांचे अनुभवी बनल्यामुळे आज समाजात त्यांचेच प्राबल्य असल्याचे दिसून येते. परंतु क्षणिक सुख देणारे विकार अंती अप्राप्ती, असंतुष्टता, दुःखच देण्यासाठी कारणीभूत ठरतात. हे समजून योगी आत्म्यांनी यापासून वैराग्य धारण केले पाहिजे. सांप्रत समयी परमात्म्याच्या श्रीमतानुसार मार्गक्रमण करूनच ईश्वरी सुखाची अनुभूती होईल. कुठल्याही विकारी वृत्तीला बीजापासून समूळ नष्ट करण्यासाठी बीजरूप स्थितीची साधना करणे आवश्यक आहे.

**• मान सन्मानापासून वैराग्य :**

कलियुगात मान सन्मानासाठी काम करणे, त्यापाठीमागे धावणे ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. परंतु विचार करा की ज्याला स्वतः परमेश्वर आणि भक्तगण मान देत आहेत त्याने अशी मान सन्मानाची इच्छा बाळगणं योग्य आहे का? म्हणूनच श्रेष्ठ योगीजनहो, अशा अल्पकाळाच्या सन्मानाच्या इच्छेचा त्याग करून स्वमानात स्थित व्हा.

**• इच्छा, आकांक्षांपासून वैराग्य :**

आजचा मानव भौतिक इच्छांच्या तालावर नाचताना दिसतो. परंतु ज्यांना पिता परमात्म्याने आपलं म्हटलं. त्याच्याकडून सर्वश्रेष्ठ प्राप्तीचा अधिकार मिळाला अशा ब्रह्मावत्सांनी छोटया छोटया इच्छांचे गुलाम होणं शोभत नाही. ज्यांना सर्वांच्या मनोकामना पूर्ण करायच्या आहेत त्यांनी अशाप्रकारे इच्छा आकांक्षांमागे का बरं धावावं? म्हणूनच 'आता काहीही नको' अशी विरक्ती अनुभवून तृप्त महान आत्मा बना.

**• देह आणि दैहिक संबंधांपासून वैराग्य :**

तमोप्रधान तत्वांनी बनलेल्या या शरीराचा श्रृंगार का करावा? खरंतर श्रृंगार करायचा तो आत्म्याचा जो युगानुयुगे अबाधित राहिल. ५००० वर्षांच्या यात्रेमधील हे अंतिम दैहिक संबंध आहेत. यात कुठलीही आसक्ती नसावी. नातेवाईकांना टाळायचे किंवा आपल्या कर्तव्याचे पालन करायचे नाही असा याचा अर्थ नाही. 'हे माझं' 'ते माझं' असे देहभान टाळून निमित्त बनून कर्म करायचं आहे. दोन्ही गोष्टींचं संतुलन राखून वागणं हे ज्ञानीजनांचं खरं ज्ञान आहे.

**• व्यर्थ गोष्टींपासून वैराग्य :**

व्यर्थ बोलणे, ऐकणे, पाहाणे, चिंतन करणे या सगळयापासून वैराग्य हवे. व्यर्थ गोष्टींमधे आवडीने सहभागी होण्याच्या इच्छेने बुद्धी अस्वच्छ आणि आत्मा दुर्बळ बनतो. म्हणूनच ज्यांना शक्तिशाली होऊन अनेकांना आध्यात्मिक बळ द्यायचं आहे.त्यांना व्यर्थ गोष्टींपासून वैराग्य धारण करावच लागेल.

याचा अर्थ असा मुळीच नाही की विद्यार्थ्यांनी अभ्यासात किंवा व्यापाऱ्यांनी व्यापारात अधिक लक्ष देऊ नये. वैराग्य म्हणजे निष्क्रियता नव्हे. **वैराग्य येऊन काही भाबडी माणसे चांगल्या कार्यांतूनही बाहेर पडतात, याला विवेक म्हणता येणार नाही. परंतु आपण जे काही करत आहोत ते निमित्त भावनेने व पिता परमात्म्यासाठी 'ईश्वरार्थ' आहे अशी शुभ भावना ठेवून कर्म करावे.**

चला तर मग, विश्वात सर्वत्र बेहदच्या वैराग्याची सरिता प्रवाहित करूया. जेणेकरून मानव संपूर्ण सुखी होईल. काही महान आत्म्यांची संपूर्ण वैराग्यवृत्ती या जगात वैराग्य उत्पन्न करायला कारणीभूत ठरेल व अनेक योगीजनांच्या पुरूषार्थाला तीव्रगती देईल. जोपर्यंत विजयी रत्नांना विरक्ती येणार नाही तोपर्यंत नवयुग स्थापनेच्या दिव्य कार्याला उशीर होईल. ज्यामुळे अनेक मनुष्यात्म्यांना दुःखी आयुष्य कंठावं लागेल. म्हणूनच हे अमूल्य विजयी रत्नांनो. वेळीच आसक्तीला ओळखून त्यापासून मुक्त व्हा. जीवनात वैराग्याचं खरं सुख प्राप्त करा.

**(पान क्र. २५ वर)**



# विद्या विनयेन शोभते!

**ब्रह्माकुमार हेमंत भाई शांतिवन (आबू रोड)**

एके ठिकाणी पाणी भरुन एक कळशी ठेवलेली असायची. कळशीच्या तोंडावर एक वाटीचे झाकण ही ठेवलेले असे. कळशी मुळातच परोपकारी स्वभावाची होती. रिकामे ग्लास, तांब्या तिच्यापाशी येत व पाण्यासाठी मान झुकवीत. कळशी त्यांच्या विनम्र व्यवहाराने प्रसन्न होऊन नम्रपणे स्वतःही खाली वाकून पाणी देई. तेव्हा सर्व पात्र पाणी घेऊन आनंदानं परत जात. सर्वांना खुशीने जाताना पाहून वाटीला कळशीचा खूप राग येई. एके दिवसी वाटीने कळशीपुढे गाऱ्हाणे मांडले, 'मी बऱ्याच दिवसांपासून पाहतेयं. जे भांडं तुझ्याजवळ येतं, त्याला तु पाण्यानं भरते. पण मी ही तुझ्या सोबत राहते, तरीही तू मला कधी ही थेंबभर पाणी पाजत नाही, तू असा भेदभाव का करतेस? तेव्हा कळशी म्हणाली, ''हे वाटी, तुझा काहीतरी गैरसमज झालायं, मी भेदभाव नाही करत. बघ, कोणतही पात्रं माझ्या समोर नम्रतेने खाली वाकतं. म्हणून मी ही त्यांच्या नम्रतेला दाद देत खाली वाकून जलदान करते. पण तू नेहमीच माझ्या डोक्यांवर बसलेली असते, थोडं विनित भाव भरुन माझ्या पुढे वाकून तर पहा, मग मी तूला कशी थंड पाण्यानं भरते! नम्रतेने झुकायला शिकली तर कधीच रिकामी नाही राहणार.'' कळशीचे हे उत्तर ऐकून वाटीचा गर्व मिटला व तिला नम्रतेचे महत्त्व कळलं.

जगात काही प्राप्त करायचं असेल तर, कुणाच्या डोक्यावर नाचुन नाही चालत! कधी-कधी वाकावं ही लागतं. **स्वतःचा 'अहम्' त्यागून जोपर्यंत माणूस नमत नाही, तोपर्यंत पदरी काहीच पडत नाही. खरं तर नम्रतेने जग जिंकणे अति सहज! परंतु स्वतःची कुवत नसून ही गर्विष्ठ होऊन, लोकांना भलताच तोरा दाखवून महान बनणे सर्वथा अशक्यच!** पण कधी-कधी अल्प बुध्दिजिवी मानव क्षणभंगुर सुख देणाऱ्या विनाशी प्राप्ती मुळे घमेंड करु लागतो. त्याला आभाळ ही ठेंगणे वाटतं. विनाशी प्राप्तींच्या नशेत अज्ञानी अभिमानी सहज हुरळतो व इतरांना मदमस्त हत्तीप्रमाणे पायाखाली चिरडायचा प्रयत्न करतो. मोठा अधिकारी झाला तर कर्मचाऱ्यांवर रुबाब करतो. घरात वयाने वा मानाने मोठा असेल तर आपलेच खरं करतो. हाती पैसा अडका आला तर विश्व विकत घ्यायला निघतो. सत्ता-संपत्ती मिळाली, तर स्वतःस बादशहा मानतो. अंगी थोडे कला-गुण आले, विशेषता उपजल्या, तर स्वतःस मोठा महान समजतो व स्वतःच्या मुखाने स्वतःचे गुणगान करत फिरतो. असा मनुष्य दंभी-ढोंगी बनतो व अंती नष्ट होतो.

म्हटले ही जाते, ''ऊंचा हुआ तो क्या हुआ, जैसे पेड खजुर। पंछी को छाया नही, फल लागे अति दूर।।'' अर्थात आभाळ शिवणाऱ्या खजुराच्या झाडासारखी आकाशाची उंची गाठून ही दुसऱ्याला स्नेहाची छाया देता येत नसेल तर धनवान, बलवान, रुपवान होण्यात कोणते मोठेपण? **व्यक्ती मोठ्या पदावर असला, तरी खजुराच्या झाडासारखा अकडू बनून सुखाऐवजी दुःखच देत असेल, तर त्यात त्याची कोणती महती व महानता सिध्द होते? ऊंच पदाच्या नावावर इतरांना सतविण्यात ना स्वतःची बढाई ना इतरांची भलाई!** भलाई तर वाकलेल्या वृक्षासमान विनम्रतेने सर्वांना सहयोग देण्यात आहे. दगडाचा मार सोसून ही फळं देणाऱ्या वृक्षासम परोपकाराची रसाळ फळं चाखविण्यात आहे. विश्व

विजयी बनायचे असो वा सन्मानाचे शिखर गाठायचे असो, मन छोटं करुन कसं चालेल? त्यासाठी काळीज आभाळाएवढं मोठं करावच लागेल, प्रत्येकाच्या अस्तित्वाला स्वीकार करुन, त्यांच्या कर्म-कर्तृत्वाला सलामी द्यावीच लागेल. कलाकाराच्या कलेला मानाचा मुजरा द्यावाच लागेल आणि हे केवळ नम्रतेनेच संभव होऊ शकते.

नम्रता म्हणजे गुणीजनांच्या गुणांना मनापासून स्वीकारणं व त्यांना सन्मान देणं आणि कलेची कदर करुर कलाकाराचा सत्कार करणं. इतरांच्या चांगुलपणाला मनोमन मान देऊन त्यांना ऊंच नजरेनं पाहणं. अंहकाराचा त्याग करुन सहजतेने झुकणे नम्रता आहे. स्वतःच स्वतःचे गुणगान करण्या ऐवजी स्वतःच्या विशेषतेला स्वतः लपवणे किंवा गुप्त ठेवणे, आपणहून लहान हीन दीनांच्या समोर पद-प्रतिष्ठा-पैशाचा दंभ न भरता, त्यांना स्वतःहून उंच उठवणे. **देहिक रुप-रंग, जात-पात, धर्म-कर्म इत्यादी भेदभाव न करता, सर्व मानवात्म्यांना एका ईश्वराची संतान समजून, प्रत्येकात वसत असलेल्या आत्म्यास समदृष्टीने पाहणे व त्यांच्या अत्मिक गुणांना स्वीकारुन प्रत्येक आत्म्याच्या गुणस्वरुपासमोर नतमस्तक होणे ही नम्रताच आहे. स्वतःच्या उच्च उपाधी, उपलब्धीला स्वीकार न करता त्यास ईश्वराचे वरदान मानणं,** यशाचे श्रेय स्वतः न घेता त्यास मातपिता गुरुजनांचा आशिर्वाद मानणे, अशा कितीतरी छटा आहेत नम्रतेच्या. नम्रता तर तो गुण विशेष आहे जो मनाला महानता, बुध्दीला दिव्यता आणि ह्रदयाला उदारतेने भरपूर करतो. खरं तर नम्रतेची जननी आहे निरहंकारिता आणि नम्रतेचा जनक म्हणजे पिता आहे उदारता.

विनम्र व्यवहार हाच महापुरुषाचा खरा पोषाख वा परिधाण आहे. वाणीतील विनम्रता आपणहूनच महानतेची पोचपावती देते, हेच सांगणारी ही बोधकथा आहे. एकदा एक राजा आपल्या मंत्री व सेवका सोबत वनभ्रमणाला निघाला. पण वाट चुकल्याने ते भरकटले व एकमेकांना शोधू लागले. वाटेत एक अंध-साधु तपस्या करत होता. सर्वांत आधी सेवक साधुजवळ येऊन म्हणाला, ''हे आंधळ्या, इकडे कुणी आले होते का?'' साधुने मान हालवून त्याला नकार दिला. तो पुढे गेल्यावर मंत्री आला व त्याने साधुला विचारले, ''अहो सुरदास बाबा, कुणी इथं आलं होत का?'' तेव्हा साधु उत्तरला, ''होय तुमचा नोकर येथून गेला.'' नंतर राजा ही आला व त्याने विचारले, ''हे दिव्य-चक्षुवान महात्मन् नमस्कार! इकडून कुणी गेलयं का?'' तेव्हा साधुने सांगितले, ''तुमचा नोकर व मंत्री आत्ताच येथून गेलेत.'' थोड्याच वेळात सेवक व मंत्री राजाला शोधत-शोधत पुन्हा तिथेच साधु जवळ आले. तेव्हा राजाने साधुला विचारले की दिसत नसून ही आपण सेवक, मंत्री व राजाला कसे ओळखले. साधु म्हणाला, ''वाणीने, ऐ आंधळ्या -हे शब्द नोकरच बोलू शकतो, मंत्री थोडा ज्ञानी असल्याने त्याने सुरदास म्हटले, परंतु विनम्र वाणीने दिव्यचक्षुवान महात्मा हे संबोधन देऊन नमस्कार करणारा राजाच असू शकतो.'' नम्रता व्यक्तीस शालीन-सभ्य बनविते. राजकुलीन व्यक्तीचे विनयशील आचरण त्यास उच्च पदावर बसवते.

**नम्रचित्त व्यक्ती स्वतःच्या सद्गुणांच्या सुवासाने वातावरण सुगंधित करतो. नम्रता व्यक्तीस परोपकारी बनवते आणि मानवतेचा पुजारी वा जनता जनार्दनाच्या सेवकाच्या रुपात प्रस्तुत करते.** जसं विशाल वटवृक्षावर पक्षी घरटी बनवतात, त्याने वटवृक्ष सर्वांचे आश्रयस्थान ठरतो. अगदी असंच नम्रतेचा धनी अनाथ, असहाय, निर्बल, दुर्बल व्यक्तींचे आशास्थान ठरतो. हिंदीत एक म्हण आहे, ''झुकता वही - जिसमें जान होती है, अकडना तो मुर्दे की पहचान होती है'' अर्थात झुकतो तोच ज्याच्यात जान म्हणजे प्राण असतो, पण अकडूपणा तर मेलेल्या मुड्याचे लक्षण असते. खरे तर ज्या व्यक्तीच्या वागण्यात बोलण्यात मानवता-दिव्यता म्हणजे जीवंतपणा असतो तीच व्यक्ती ताठपणा सोडून सर्वांसमोर विनयाचे प्रदर्शन करु शकतो. जसा फळांनी बहरलेला वृक्ष स्वतः वाकतो, त्याचप्रमाणे सद्गुण रुपी

फळांनी जो भरपूर असतो तो सहजतेने वाकतो अर्थात तो स्वतः वाकून सर्वांना नमवतो. सर्वगुण संपन्न मानव नम्रचित्त व्यवहाराने सर्वांना सुखाची सावली ही देतो व नम्रतेच्या श्रृंगाराने थोर बनतो.

**धर्म–अधर्माच्या युध्दात नम्रतेचे अवतार श्रीराम विजयी झाले, परंतु अहंकारापोटी रावण मारला गेला.** मृत्यूमुखी पडलेल्या दशाननाकडून उपदेश घेण्यासाठी रघुवीरांनी लक्ष्मणास पाठविले. तेव्हा लक्ष्मणास रावणाने उपदेश न देता तसेच परत पाठवले. तेव्हा श्रीरामांनी विचारलं, ''लक्ष्मणा, तू नेमका कुठे उभा होतास?'' लक्ष्मण म्हणाला, ''रावणाच्या डोक्याजवळ !'' तेव्हा श्रीरामांनी लक्ष्मणाला समजावले, ''रावण अंहकारी असला तरी तो एक विद्वान आहे, त्याच्या पायापाशी उभं रहा, त्याला नमन करुन त्याची स्तुति कर, तो नक्कीच नम्रतेपुढे नतमस्तक होऊन तुला शिक्षा देईल.'' लक्ष्मणाने श्रीरामांच्या आज्ञेप्रमाणे विनम्रतेने महिमा करुन लंकेशचे मन जिंकले. तेव्हा रावणाने आयुष्याचे तीन अनमोल अनुभवयुक्त सिद्धांत दिले. ''१) शत्रूस कधीही कमजोर समजू नये, २) वडिलधारी मंडळी व शुभचिंतकाचा सल्ला ऐकावा आणि ३) मनात कोणताही शुभ संकल्प (सद्‌विचार) आला तर तत्क्षणी लगेच तो पूर्ण करावा. मी रामास कमजोर मानले, नातेवाईक व शुभचिंतकाचा सल्ला ऐकला नाही व सीतेला परत करायचा विचार आल्यावरही टाळत गेलो व हारलो. खरोखर जर विनयशील बनून रावणासारख्या कठोर स्वभावी व्यक्तीचे गुणगाण केले तर पाषाण हृदयाला ही पाझर फुटू शकतो.

**नम्रताही अहम् (अंहकार) आणि वहम (संशय) ह्या दोन्हीं दुष्प्रवृत्तींचा सहज नाश करते व धीर गंभीर बनवून व्यक्तीस परिपक्व बनवते. नम्र व्यक्तीच जीवन जगायची कला जाणू जाणें!** तोच मनुष्य समजदार व बुध्दिवान मानावा लागेल जो विनयशील बनून विकृत व्यक्ती व विपरित परिस्थितींवर मात करतो आणि जीवन संघर्षात सफल होतो. तो इतरांच्या आदराचा पात्र ही बनतो. खरं तर नम्रता व्यक्तिमत्वाच्या भव्यतेला आकार देते. हे महामूल्य आदर्श मानवाचे आभूषण आणि सभ्य समाजाचा आकर्षक श्रृंगार व दैवी संस्कृतीचा सुरेख अंलकार सुध्दा आहे. नम्रचित्त व्यक्ती बालकासमान लवचीक असतो. अबोध बालका समान निष्पाप निरागस असल्याने तो सर्व प्रिय बनून सर्वांचा प्रेमपात्र ही ठरतो. ह्या दिव्यगुणात क्रूर–कठोर व्यक्तीचे मन परिवर्तन करुन, वैरी–विरोधींना ही सहयोगी बनविण्याचे जादूई बळ आहे. **दादी प्रकाशमणि आपल्या नम्रचित्त व्यवहाराने सर्वांचे हृदय जिंकत असत. म्हणून कुणाचेही मनं जिंकायचे असो कुणाकडून काही मिळवायचे असो, तर नम्रतेला धारण केलच पाहिजे.**

राजा जीतसिंह विद्वान असूनही विनम्रतेचे स्वामी होते. त्यांचा एकुलता एक पुत्र होता सुधर्म सिंह. सुधर्म सिंह नावाप्रमाणे धर्मप्रिय राजा बनावा–ह्या उद्देशाने राजाने त्याला गुरुपाशी ज्ञानार्जन करण्यासाठी पाठविले. राजपुत्र विविध विद्या प्राप्त करुन परतला. परंतु त्यास भ्रम झाला की तो पित्यापेक्षा ही तो मोठा विद्वान बनलायं. पित्याच्या चाणाक्ष नजरेने त्याचा गर्विष्ठपणा टिपला. राजाने त्यास विचारले, ''तू गुरुकडून काय काय शिकलास?'' तेव्हा पुत्र म्हणाला, ''पिताश्री, मी व्याकरण, वेद–उपनिषद, राजनिती, अर्थशास्त्र व शस्त्र–शास्त्र इत्यादी सर्व विद्या शिकलो. आता शिकायचे काहीच शिल्लक नाही.'' राजा म्हणाला, ''पुत्रा, जी विद्या प्राप्त केल्यावर काहीही शिकायची गरज राहत नाही, नेमकी तीच विद्या तू अर्जित नाहीस केली.'' हे ऐकून पुत्र आश्चर्याने म्हणाला, ''अशी कोणती विद्या आहे?'' पिता म्हणाला, ''ती विद्या गुरुकडे आहे'', तेव्हा राजपुत्राने गुरुला आपल्या पित्याची गोष्ट सांगितली. गुरु त्यास म्हणाले, ''ती विद्या आहे विनम्रता आणि ती तर तुझ्या पित्यापाशीच आहे'' विनम्रतेची महती जाणल्याने राजकुमाराचे आचरण पूर्णपणे बदलले.

अथक परिश्रमाने विद्वान–वैज्ञानिक वा ज्ञानी–ध्यानी बनणे तसे अवघड कुठे? साधना–अराधना करुन सिध्दी मिळवणे ही तसे असाध्य कार्य **(पान क्र. २२ वर)**



# पवित्र दृष्टी

ब्र. कु. किरण, बोरिवली (मुंबई)

'जशी दृष्टी तशी सृष्टी' असे म्हटले जाते. दृष्टीचा अर्थ आहे वृत्तीसहित आपली नजर. पवित्र दृष्टी ही त्यांचीच म्हटले जाते ज्यांची वृत्ती पवित्र आहे. ज्यांची वृत्ती पवित्र असते, त्यांची आजूबाजूची दुनिया, त्यांच्या अंतरंगातील दुनिया सर्व काही त्यांना पवित्र अर्थात सकारात्मक दिसते. परमपिता शिवबाबांनी आपल्याला बेहदची उच्चतम पवित्रता शिकवली आहे. प्रत्येक कर्मेंद्रियाची पवित्रता शिकवली आहे. **जसे की कानांची पवित्रता अर्थात कानांनी कुठल्याही वाईट गोष्टी ऐकू नका, मुखाची पवित्रता अर्थात मुखाने कधीही वाईट शब्द बोलू नका, डोळ्यांची पवित्रता अर्थात डोळ्यांनी कधीही वाईट बघू नका, हातांची पवित्रता अर्थात हातांनी वाईट कर्म करू नका, तसेच मनाची पवित्रता अर्थात मनाने कधीही वाईट संकल्प करू नका.** शिवबाबांनी आपल्याला आत्म्याची जी सूक्ष्म इंद्रिये-मन, बुद्धी व संस्कार यांचे ज्ञान देऊन, सूक्ष्म पवित्रता शिकवली आहे.

**प्रत्येक विकार डोळ्यात दिसून येतो**

सर्वात सूक्ष्म आहे मन. मनाचा संबंध प्रत्येक कर्मेंद्रियाशी आहे. डोळ्यांशी तर त्याचा घनिष्ठ संबंध आहे. आपण जेव्हा डोळ्यांनी काही पाहतो तेव्हा लगेचच मनात विचार सुरु होतो आणि काही विचार केला तर तो चटकन डोळ्यातून दिसून येतो. वाईट भावनासुद्धा आधी मनात येते नंतर ती डोळ्यातून दिसून येते. जसे की क्रोध, मुखाने जरी काही बोलले नाही तरी आपल्या डोळ्यातून क्रोध व्यक्त होतो. तसेच लोभ असणारे डोळे, एखाद्या चोराच्या डोळ्यासारखे दिसतात. मोह असणारे डोळे वेगळे असतात व स्नेहभाव असणारे वेगळे असतात. कारण मोह हा विकार आहे व प्रेम हा आत्म्याचा एक गुण आहे. अहंकार असणारे डोळे लगेच लक्षात येतात. सर्वात मोठा विकार आहे -'काम'. काम विकाराची काळी नजर तर पहाता क्षणीच लक्षात येते.

**गुणसुद्धा डोळ्यात दिसून येतात.**

जसे विकार डोळ्यात दिसून येतात तसे गुणसुद्धा डोळ्यात दिसून येतात. जसे की शांती, प्रेम, दयाभाव, हिंमत, दृढता, मधुरता इत्यादी. आपल्या भावना डोळ्यातून का दिसून येतात याचे कारण हे असावे की आपल्या डोळ्यात पाणी असते. बाकी संपूर्ण शरीरातून मात्र रक्ताचा संचार होत असतो. **मूर्तिकार जेव्हा मंदिरातील मूर्ती घडवतो तेव्हा सुद्धा तिचे डोळे अतिशय सुंदर, शोभनीक व आकर्षक बनवतो. भक्तगण जेव्हा मूर्तीचे पूजन वा आराधना करतात तेव्हा मूर्तीच्या डोळ्यातील भाव निरखून पाहतात.** मूर्तीचे कान, नाक, मुख इत्यादीकडे फारसे लक्ष देत नाहीत.

**जशी वृत्ती तसे प्रकंपन**

दृष्टीच्या ही आधी असते वृत्ती. जशी आपली वृत्ती असेल तसे प्रकंपन वातावरणात पसरतात. **हे सत्य आहे की आपल्या प्रत्येक विचाराचे प्रकंपन वातावरणात पसरतात. अशाच प्रकारची प्रकंपने जड आणि चैतन्य गोष्टींना प्रभावित करीत असतात. त्यामुळेच प्रत्येक घरातील वातावरण हे भिन्न-भिन्न असते.** एखाद्या मंदिरातील वातावरण व क्लबमधील वातावरण यांच्यात फार मोठा फरक असतो कारण त्याठिकाणी तशाच विचारांचे लोक येत असतात. आपल्या घरात आपण प्लॅस्टिकची फुले ठेवतो.

त्यांच्यात सुगंध नसतो. परंतु त्यांच्यात सुंदरता असते. ही फुले जेव्हा-जेव्हा आपण पहातो तेव्हा मनात हा विचार येतो की ही फुलं किती सुंदर आहेत आणि ह्या विचारांची प्रकंपने वातावरणात पसरतात. कोणतीही जड वस्तू प्रकंपने पसरवू शकत नाही. परंतु त्यांना पाहून, त्यांच्या सुंदरतेचा अनुभव घेऊन, आपण चैतन्य आत्मे प्रकंपन पसरवू शकतो.

**वाईटातही चांगले शोधत गेल्यानेच पूजनीय देवता बनू**

एखाद्या सुंदर गोष्टीला कोणीही सुंदरच म्हणेल, चांगल्याला कुणीही चांगले म्हणेल परंतु सुंदरता नसलेल्या व अप्रिय अशा गोष्टीतही जी चांगले शोधते तिला पवित्र दृष्टी-वृत्ती असे म्हटले जाते. संगमयुगात स्वयं परमपिता परमात्मा शिव, आपल्याला ही कला शिकवितात. भक्तगण मंदिरात गेल्यावर ईश्वराला किंवा इष्ट देवीदेवतांना हेच सांगतात की आमच्यावर पावन कृपा दृष्टी ठेवा, आमच्या चुका माफ करा, आमची पापे धुवून टाका, पाप नकारात्मक आहे व ते माफ करणे सकारात्मक आहे. त्यामुळे भक्तांच्या म्हणण्याचा अर्थ हाच आहे की आमच्या नकारात्मक गोष्टींना सकारात्मकमध्ये परिवर्तन करा. **तात्पर्य म्हणजे वर्तमान संगमयुगात जे आत्मे वाईट गोष्टीतही चांगले शोधतील तेच पूजनीय देवता बनतील. द्वापरयुगात त्यांचीच मंदिरे बनतील. त्यांचे भक्त त्यांच्याकडून हीच कामना करतील की आमची पापे व गुन्हे माफ करा.** (याउलट ज्यांच्यामध्ये वाईटातही चांगले बघण्याची कला नाही ते देवता बनले तरी पूजनीय देवता बनणार नाहीत. कारण गायन तर ३३ कोटी देवीदेवतांचे आहे. परंतु पूजनीय मात्र १६१०८ त्यानंतर अधिक पूज्य १०८ त्यानंतर सर्वाधिक पूज्य केवळ ८ च बनतात.)

आपले ब्रह्मावत्सांचे लक्ष्य आहे, पवित्र दुनिया स्थापन करण्याच्या ईश्वरीय कार्यात मदतगार बनणे. ही गोष्ट जर सदैव आपल्या बुद्धीत असेल तर पवित्रतेची धारणा करणे अवघड वाटणार नाही. जसे छत्री बनविणाऱ्याच्या बुद्धीत होते की मला पाऊसापासून बचावासाठी छत्री बनवायची आहे आणि त्यादृष्टीने त्याने छत्री निर्माण केली. तसेच आपल्याही बुद्धीत असले पाहिजे की आपल्याला पवित्र सत्त्वप्रधान दुनिया स्थापन करायची आहे म्हणजे आपण स्वतःच पवित्र बनत जाऊ. असेही म्हटले जाते की दुनिया स्वतःपासून सुरु होते व पूर्ण देखील स्वतःवरच होते. त्यामुळे जेव्हा आपण स्वतःला बदलण्याची सुरुवात करु तेव्हा दुनिया देखील बदलायला सुरुवात होते आणि जेव्हा आपण संपूर्ण पावन बनतो तेव्हा दुनियासुद्धा संपूर्ण पावन बनते.

***

## स्वर्ग रचयिता - परमात्मा शिव पिता

परमात्मा शिव पित्याने, भागीरथ ब्रह्मांना निवडले।
भारतात या स्वर्ग स्थापण्या, त्यांना निमित्त बनविले।।१।।

ब्रह्माबाबांनी तन-मन-धन सारे, रुद्र यज्ञी अर्पिले।
साडे तीनशे ब्रह्मावत्सांचे, पालक पिताश्री बनले।।२।।

चौदा वर्षे ब्रह्मावत्सांनी, महान तप ते केले।
विश्व परिवर्तन करण्या, मग ते निमित्त बनले।।३।।

रात्र-रात्र जागून पिताश्रींनी, सूर मुरलीचे घुमविले।
तेणे देश-विदेशीचे पूर्वज आत्मे, मधुबनी परतूनी आले।।४।।

आदरणीय दादी जानकीजींनी, ज्ञानबीज जगी पेरले।
मातेश्वरींनी 'जगदंबा' हे श्रेष्ठ स्थान मिळविले।।५।।

विश्वनाटकी मुकुट मस्तकी, तीव्र पुरुषार्थाने चढले।
मम्मा-श्री लक्ष्मी, पिताश्री - श्री नारायण, पूजनीय जगी झाले।।६।।

- ब्र. कु. वसंत निंबाळकर, कागल (कोल्हापूर)



# मानव जीवनाचे लक्ष्य-प्रसन्नतेची प्राप्ती

ब.कु. बालूभाई शांतिवन (आबू रोड)

**प्रसन्नतेची प्राप्ती हे मानव जीवनाचे लक्ष्य आहे. परंतु प्रसन्नतेसाठी आत्म्याची संपूर्णता परम आवश्यक आहे. अशी स्थिती प्राप्त केल्यानंतर आत्मा सदैव सच्चिदानंद स्वरुपाचा अर्थात प्रसन्नतेचा अनुभव करतो.**

प्रत्येक मनुष्य आपल्या मनाची प्रसन्नता कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करीत असतो. कुणी ईश्वरीय ज्ञानाच्या आधारे मनाला प्रसन्न ठेवण्याची कला आत्मसात करतो व आपल्या जीवनात अनेक सिद्धी प्राप्त करतो. परंतु अज्ञानी मनुष्य मनाला प्रसन्न ठेवण्यासाठी चुकीच्या मार्गाचा अवलंब करतात. उदा. एखादा मनुष्य तंबाखू खायला लागतो; कुणी वरचेवर चहा, कॉफी पितो, कुणी सिगारेट प्यायला लागतो. कुणी ड्रींक्स (दारु) प्यायला लागतो. हे सगळं कश्यासाठी? तर मनाला जरा फ्रेश वाटावं. तरतरी वाटावी म्हणजेच काही अंशी प्रसन्न वाटावं म्हणूनच ना! परंतु मनुष्याला हे कळत नाही की या सवयीच्या अथवा व्यसनाच्या आहारी जाऊन आपण केवळ अल्पकाळासाठी 'फ्रेशनेस' (तरतरी) जरी प्राप्त करीत असलो तरी या गोष्टी दीर्घकाळानंतर आरोग्यासाठी अतिशय हानिकारक आहेत. कित्येक मोठ्या कलाकारांचे जीवन चरित्र जर आपण पाहिलं तर त्यांनी आपल्या जीवनात कलेची उपासना जरूर केली. परंतु ती करत असतांना, कुठल्या तरी व्यसनाच्या आधिन झाले. परिणामतः वैयक्तिक जीवनात ते अपयशी ठरले. **तात्पर्य म्हणजे ज्ञानी असो वा अज्ञानी असो, सर्वांनाच आपल्या जीवनात सदैव प्रसन्नता असावी असेच वाटते. त्यामुळे आज आपण प्रस्तुत लेखात अशा युक्त्या पहाणार आहोत ज्याद्वारे आपले मन सदैव प्रसन्न राहिल.**

## प्रसन्नतेचा आधार-सकारात्मक विचारधारा

कुठल्याही परिस्थितीत सकारात्मक विचारधारा असेल तर आपल्या मनाची प्रसन्नता कायम रहाते. या अनुषंगाने एक बोधकथा आपण पाहू या -

एकदा देवी-देवतांच्या सभेत अशी चर्चा सुरु झाली की सर्व देवी-देवतांमध्ये सर्वाधिक प्रसन्न रहाणारी देवी वा देवता कोण आहे? वास्तविक सर्वच देवी-देवता या प्रसन्न असतात. परंतु सर्वाधिक प्रसन्न कोण रहातो, असा प्रश्न होता. त्यामुळे याविषयी बरीच चर्चा रंगली. बरीच नावे पुढे आली. त्यावर चर्चा झाल्यानंतर बहुमताने हा निष्कर्ष निघाला की श्रीकृष्ण हा सर्वाधिक प्रसन्न देवता आहे. परंतु या गोष्टीबाबत मात्र श्रीकृष्णाची परीक्षा घ्यायचं ठरलं. त्यासाठी एक दृश्च निर्माण करण्यात आले.

श्रीकृष्ण हे सत्यभामा यांच्या समवेत द्वारकेत फिरत असतांना रस्त्यात एक मेलेला कुत्रा सत्यभामेच्या दृष्टीस पडला. त्याच्याभोवती माशा घोंघावत होत्या. त्याची जीभ बाहेर निघाली होती. त्याला पाहून सत्यभामा श्रीकृष्णाला म्हणाली, ''नाथ! किती वाईट मृत्यू आला आहे या कुत्र्याला? त्याचे हाल बघवत नाहीत. त्याने नक्कीच भयंकर पाप केले असेल म्हणून त्याची अशी दुर्दशा झाली आहे.'' हे दृश्य पाहून सत्यभामा खिन्न झाली. यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना श्रीकृष्ण उत्तरले, ''हे प्रिये! तू या कुत्र्याची अशी स्थिती पाहून खिन्न का होतेस? तू त्या कुत्र्याचे मजबूत दात

तर बघ हे दात काय दर्शवतात? ते दर्शवतात की कुत्रा खरोखरच पुण्यवान होता. म्हणून मेल्यानंतर देखील त्याचे दात एकदम शाबूत आहेत. असा जर तू विचार केलास तर तुला तुझ्या मनाची प्रसन्नता कायम ठेवता येईल.''

वस्तुतः ही कथा जरी काल्पनिक असली तरी तिच्यामागे दडलेला जो बोध आहे, तो अतिशय श्रेष्ठ आहे. कुठल्याही परीस्थितीत सकारात्मक विचारधारा असेल तर मनाची प्रसन्नता कायम टिकून रहाते.

सध्या कलियुगाच्या अंती जेव्हा हे सृष्टिचक्र अंतीम टप्प्यात पोहचले आहे, अशावेही सुद्धा सर्वत्र अवकळा पहायला मिळते. प्रसन्नता केवळ देवळातील मूर्तींच्या चेहऱ्यावर पहायला मिळते. देवळाच्या बाहेर येऊन बघाल तर काय दृष्य दिसत, याचे वर्णन करायची गरज नाही. भक्त देवी-देवतांच्या मूर्तीकडे पाहून मनातल्या मनात हाच भाव साठवत असतो - ''रुप पहाता लोचनी, सुख झाले हो साजनी...'' तात्पर्य म्हणजे देवी-देवतांच्या मूर्तीच्या दर्शनाने प्राप्त होणारा प्रसन्नतारुपी प्रसाद हा भक्तांना प्रिय असतो. म्हणूनच भक्तिमार्गात देव दर्शनाला अधिक महत्व देण्यत आले आहे. परंतु भक्तांना प्राप्त होणारा हा प्रसन्नता रुपी प्रसाद स्थायी स्वरुपाचा असतो का? अर्थातच नाही. **कारण भक्त हा देह, देहाचे संबंध, वस्तू-वैभव यांच्या बंधनात जखडलेला असतो असा कर्मबंधनी आत्मा सदा प्रसन्न राहू शकत नाही. तात्पर्य म्हणजे जोपर्यंत आपण आपल्या सत्य स्वरुपाला (अर्थात आत्म्याला) व परमात्मा शिव पित्याला जाणत नाही तोपर्यंत सदैव प्रसन्न राहू शकत नाही.**

**प्रसन्नतेची गुरुकिल्ली-शुभ व श्रेष्ठ वृत्तीची धारणा**

सदैव सर्व आत्म्यांसाठी शुभ व श्रेष्ठ वृत्ती धारण करा. आपल्या वृत्तीत ही शुभ भावना असली पाहिजे की सर्व आत्म्यांना (अर्थात माझ्या भावंडांना) शिवबाबांचा वारसा (जन्मसिद्ध अधिकार) मिळाला पाहिजे. आपली ही भावना निस्वार्थ, कल्याणकारी व दयापूर्ण असल्याने अवश्य फलीभूत होते. आपण विश्वकल्याणकारी, ज्ञानस्वरुप आत्मे आहोत. त्यामुळे कुणी चुकीचे वागत असेल तर त्याला चूक अवश्य म्हणा. परंतु त्याच्या चुकीच्या गोष्टी मनात मात्र ठेऊ नका. कारण आपल्या वृत्तीत जर वाईट गोष्टी व व्यर्थ विचार असतील तर आपली मनाची सिथती अप्रसन्न होईल. तात्पर्य म्हणजे शुभ व श्रेष्ठ वृत्तीची धारणा करणे हीच प्रसन्नतेची गुरुकिल्ली आहे.

**ज्याप्रमाणे अव्यक्त बापदादा प्रत्येक आत्म्याचे अनादि व आदि स्वरुप पहातात. त्याचे वर्तमान पुरुषार्थी स्वरुप न पाहता, संपूर्ण पवित्र स्वरुप पहातात, बापसमान श्रेष्ठ स्वरुप पहातात. त्याप्रमाणे आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाचे अनादि व आदि स्वरुप आपण पाहिले पाहिजे. फलस्वरुप आपण सदैव सर्वाधिक प्रसन्न राहू शकू.**

**प्रसन्नतेची जननी संतुष्टता**

संतुष्टता सर्वात मोठा खजिना आहे. ज्याच्याजवळ संतुष्टता आहे, त्याच्या जवळ सर्व काही आहे. परंतु ज्याच्याकडे संतुष्टता नाही, त्याच्याकडे सर्व काही असूनही काहीच नाही. कारण असंतुष्ट आत्मा आपल्या इच्छेचा गुलाम असतो. सर्व काही असूनही आणखी काही पाहिजे असे त्याला वाटत असते. तात्पर्य म्हणजे जेथे 'अजून पाहिजे-अजून पाहिजे' ही भावना असते तेथे संतुष्टता कधीही नसते. म्हणूनच ज्ञानसागर शिवबाबा वारंवार सांगतात की 'इच्छा मात्रम् अविद्या' बना.

**सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जेथे संतुष्टता आहे तेथे सदा प्रसन्नता आहे. कारण संतुष्टता ही प्रसन्नतेची जननी आहे. त्यामुळे सदैव हा स्वमान धारण करा की 'मी संतुष्ट आत्मा आहे.' फलस्वरुप आपण स्वतःही संतुष्ट राहू व दुसऱ्यांनाही संतुष्ट करु शकू. वास्तविक हेच खरे आत्मिक प्रेम आहे.**

कित्येक जण प्रशंसेच्या आधारे प्रसन्नतेचा अनुभव करतात. परंतु ही प्रसन्नता अल्पकाळापुरती मर्यादित असते. त्यामुळे चेक करा की आपली

प्रसन्नता ही प्रशंसेवर आधारित तर नाही ना. कारण प्रशंसेची अभिलाषा बाळगणे ही सुद्धा रॉयल रुपातील इच्छाच आहे.

**अंतर्मुखता देई प्रसन्नता**

बाह्य जगतातील दूषित वातावरणाचा तसेच वाईट संगाचा दुष्परिणाम आपल्या मनःस्थितीवर होऊ नये, यासाठी अंतर्मुखता पाळा. अंतर्मुखता हेच आंतरिक वा आत्मिक सुरक्षिततेचे साधन आहे. ज्याप्रमाणे मंदिरातील मूर्ती ही सर्व गोष्टींपासून (धुरळा, ऊन, वारा, पाऊस इत्यादी) सुरक्षित रहावी यासाठी तिची स्थापना गाभाऱ्यात केली जाते. त्याप्रमाणे राजयोगी हा देखील अंतर्मुखतेच्या गाभाऱ्यात राहून, बाह्य परिस्थितीपासून स्वतःला सुरक्षित ठेवतो. अंर्तुखता हे जणू त्याच्यासाठी एक प्रकारचे सुरक्षा कवच असते. ते कवच माया भेदू शकत नाही. महणूनच गायन केले जाते - 'अंतर्मुखी सदा सुखी'. हे आंतरिक सुख म्हणजेच मनाची प्रसन्नता होय.

सदा प्रसन्न रहाण्यासाठी प्रामुख्याने तीन गोष्टींची पालना करणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट 'प' अर्थात 'प्रभाते मनी राम (शिवबाबा) चिंतीत जावा' दुसरी गोष्ट 'स' अर्थात 'सदा सर्वदा योग तुझा घडावा। तुझे कारणी देह माझा पडावा।' आणि तिसरी गोष्ट, 'न्न' अर्थात 'नयनो में बाबा, खयालो में बाबा। जिधर देखती हूँ तेरी याद आये।' तात्पर्य म्हणजे परमात्मा शिव पिता हा एकमेव रचयिता आहे व आपण सर्व आत्मे त्याची श्रेष्ठतम रचना आहोत. आपण सर्व जण आपापसात भाऊ-भाऊ आहोत. हा विश्वबंधुत्व भाव जर आपल्या दृष्टी, वृत्तीत सामावलेला असेल तर अवघे विश्व प्रसन्नतेने भरपूर असल्याचा अनुभव होत राहिल. प्रत्येकाचे अनादि व आदि पवित्र स्वरुप आपण पाहू. सर्वांच्या कल्याणाची भावना, शुभकामना मनात असेल. फलस्वरुप मन सदैव प्रसन्नतेने भरपूर अनुभवाला येईल. याचेच गायन केले जाते -

**तिन्ही लोक आनंदाने भरुन जाऊ दे।**
**तुझे गीत गाण्यासाठी सूर लागू दे।।**

**ईश्वरीय ज्ञान व योगाद्वारे अशी श्रेष्ठतम अवस्था आपण सारे प्राप्त करु या, हीच मंगलकामना! आपल्या सर्वांचे जीवन अविनाशी प्रसन्नतेने भरपूर होवो, हीच आंतरिक सद्‌भावना!**

**प्रसन्नतेसाठी मुरलीचे मनन-चिंतन करा.**

लेखाच्या पूर्वार्धात आपण पाहिले की भक्तिमार्गात सर्वाधिक प्रसन्न देवता श्रीकृष्णाला दर्शविण्यात येते. त्याच्या ओठावर नेहमी बासरी असते. श्रीकृष्णाच्या प्रसन्नतेचे रहस्य आहे त्याच्या ओठावरील बासरी. वास्तविक श्रीकृष्णाचे हे चित्र पिताश्री ब्रह्माबाबांच्या सत्ययुगी नंबर १ प्रालब्धाचे यादगार चित्र आहे. **असे हे उच्चतम प्रालब्ध प्राप्तीचा आधार आहे, संगमयुगातील ज्ञान मुरलीचे मनन-चिंतन व त्याद्वारे प्राप्त ज्ञानस्वरुप अवस्था. म्हणूनच शिवबाबा नेहमी सांगतात की ज्यांचा मुरलीशी स्नेह आहे त्यांचाच मुरलीधर बाबांशी स्नेह आहे.**

प्रत्येक ब्रह्मावत्स जेव्हा देहभान विसरुन, आत्मिक स्वरुपात टिकून मुरलीचे रसस्वादन करतो तेव्हा तो प्रसन्नता वा खुशीने मस्त बनतो. जसजसा हा आत्मिक नशा, मुरलीधरच्या मुरलीचा नशा चढत जातो तसतसा आपल्याला देह व देहाच्या दुनियेपासून उडती कला अनुभवाला येते. आपण कधी मूलवतन तर कधी सूक्ष्मवतनमध्ये जातो. कधी आपल्या दैवी राज्यात जातो. कधी लाइट हाऊस, माइट हाऊस बनून, या दुःखी असार संसारातील आत्म्यांना सुख-शांतीची किरणे देतो. रोज शिवबाबांच्या समवेत तिन्ही लोकात भ्रमण करतो. मुरली ऐकून अतींद्रिय सुखाच्या हिंदोळ्यात बसून झोके घेतो. मुरलीधर शिव-बाबांच्या मुरलीतील अविनाशी दुवा रुपी दवा (औषध) मिळताच तन तंदुरुस्त, मन दुरुस्त होऊन जाते. आपण बेगमपुरचे बादशहा, स्वराज्य अधिकारी बनतो. **अशी ही मुरलीधर-शिवबाबांची मुरली प्रसन्नतेचा श्रेष्ठ शृंगार करते. महणूनच प्रसन्नता ही ब्राह्मण जीवनाची पर्सनालिटी आहे, असे म्हटले जाते.**

**(पान क्र. २५ वर)**



# संगमयुगी ब्राह्मण जीवनात प्राप्त करावयाच्या सोळा कला

## (भाग – ३)

**ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे**

**१२) स्वतःला गुप्त ठेवून अन्य आत्म्यांना अग्रेसर करण्याची कला –** विश्वव्यापी महान कार्य करीत असतानाही साधारण वेषभूषा ठेवून स्वतःची ख्याती, सेवेच्या सफलतेचे श्रेय पिताश्रींनी स्वतःकडे कधीच घेतले नाही. ही फार मोठी कला व त्यांच्या मनाची विशालता होती. ज्याप्रमाणे पिताश्रींनी माता व कन्यांना नेहमीच अग्रेसर ठेवले होते. त्याप्रमाणे जी सेवा माता व भगिनींना करणे शक्य आहे त्या ईश्वरीय सेवेत आजही त्यांना अग्रेसर केले आहे. असे केल्याने सेवेत सफलता सहज प्राप्त होते. सर्व ब्रह्मावत्सांनी ध्यानात ठेवावे की, शिवबाबांनी ज्ञानकलश माता व कन्यांच्या मस्तकी ठेवला आहे. म्हणून ज्ञानमुरलीचे वाचनही बहुदा ब्रह्माकुमारी भगिनीच करतात. बुजुर्ग ब्रह्मावत्सांनी असा कधीही विचार करू नये की, 'ही छोटी कन्या ज्ञानमुरलीचे विश्लेषण कशी करू शकेल?' म्हणून त्यांनी असा विचार करावा की, ईश्वरीय महावाक्ये ऐकविण्यासाठी शिवबाबांनी कोणता माईक वापरावयाचा हा त्यांचा निर्णय आहे. त्या मुरलीतील महावाक्यांचे आकलन होऊन धारणा होणे महत्त्वाचे आहे. ब्रह्माबाबांच्या पालनेची अथवा सेवेची कोणी प्रशंसा केली तर ते नेहमी हेच म्हणत असत की, 'यह तो सारी शिवबाबाकी कमाल है। करनकरावनहार तो वह है।' **ज्याप्रमाणे प्रकाशमान हिरा अधिक काळ झाकता येत नाही. तद्वतच ब्रह्माबाबांचा आत्मारुपी हिरा व त्यांच्या प्रकाशमान कार्याची प्रत्यक्षता झाल्याने प्रत्येक सेवाकेंद्रावर, गीतापाठ शाळेत व ब्रह्मावत्सांच्या घरी त्यांचे फोटो दृष्टीपथात येतात. जो अन्य आत्म्यांना कल्याणकारी भावनेने अग्रेसर करतो तोच सर्वात अग्रेसर राहतो.** म्हणून शिवबाबांनी म्हटले आहे 'फालो फादर' अर्थात ब्रह्माबाबांच्या कर्माप्रमाणे प्रत्येक कर्म करावे.

**१३) निरुपयोगी वस्तूला उपयोगात आणण्याची व हानीलाही लाभात परिवर्तन करण्याची कला –** बंधुनो, ह्या विज्ञान युगात कोणतीही वस्तू पूर्णतः निरुपयोगी असू शकत नाही. पूर्वी लोक कित्येक वस्तूंना निरुपयोगी समजून फेकून द्यायचे परंतु गेल्या काही वर्षात कागद व कागदाचे तुकडे, शिवणकामातून राहिलेल्या कापडाचे तुकडे, जुने कपडे, न लागणारे लोखंडी सामान, रिकाम्या बाटल्या ह्यावर प्रयोग करून पुन्हा तशाच अथवा अन्य प्रकारच्या वस्तू बनविल्या जातात.

**हानीला लाभात परिवर्तन करण्याची कला –** ब्रह्मावत्सांच्या जीवनात आर्थिक हानी होण्याचे प्रसंग येतात. अशावेळी बहुतांश ब्रह्मावत्सांचा शिवबाबांवरील विश्वास डळमळीत होतो. परंतु अशा प्रसंगातही शांत राहून हानीचे लाभात कसे परिवर्तन होईल ह्याचा शांतपणे विचार करावा. केवळ शिवबाबांच्यावर दृढ विश्वास व सकारात्मक चिंतनाने हानीचे लाभात कसे परिवर्तन होते ह्यासाठी एका मातेचे उदाहरण प्रस्तुत करतो. ती माता नियमितपणे ज्ञानमुरली ऐकण्यासाठी गीतापाठशाळेत जात होती तिचा पति केवळ सहयोगी होता ती आपल्या पतीला कोर्स करण्यासाठी वारंवार आग्रह करावयाची. परंतु तो प्रत्येक वेळी नकार देत असे. त्याचा कोणता तरी व्यवसाय होता. अचानक त्या व्यवसायाला उतरती कळा लागली व एक दिवस त्याला तो व्यवसाय बंद करावा लागला. त्या मातेने त्यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली की, 'शिवबाबा आपले

नुकसान कधीच होऊ देणार नाहीत. ही तर केवळ आपली परीक्षा आहे. आज नुकसान झाले असले तरी भविष्यात काहीतरी कल्याण निश्चित होणार आहे, पुढे काही दिवसातच त्या गृहस्थांनी नवीन व्यवसाय सुरु केला. विशेष म्हणजे पूर्वीच्या व्यवसायापेक्षाही त्याला अधिक आर्थिक लाभ होऊ लागला. वाचकांना हे सांगण्याची आवश्यकता नाही की, तो सहयोगीचा योगी अर्थात राजयोगी बनला. हे उदाहरण देण्याचा उद्देश हाच आहे की, व्यापारात कधी मंदी आली तरी शांती व धैर्यता सोडू नये अशा ह्या मंदीच्या काळात काही ब्रह्माकुमार व्यापाऱ्यांचा पुरुषार्थही मंद होतो. कधी फायदा तर कधी तोटा हा व्यापाराचाच भाग नव्हे काय? जो व्यापारी धैर्यतेने व्यापार करून तोट्यातील व्यापाराला नफ्यात परिवर्तन करतो त्याचे भविष्य उज्ज्वल बनते. मंदीच्या काळात व्यापारी बंधुना रिक्त वेळ भरपूर मिळतो. अशा वेळी अविनाशी कमाई करून मालामाल व्हावे. अर्थात वेस्ट समयाला बेस्ट बनवावे. परमात्मा ह्या बिघडलेल्या विश्वाला ठीक करतो, तर 'मास्टर बिगडीको बनानेवाला' व्यापारी आपल्या व्यापाराला ठीक करू शकत नाही काय? व्यापारातील हानी (तोटा) टाळण्यासाठी योजनाबद्ध व्यापार करावा.

**१४) हास्य विनोद करण्याची कला –** जीवनात सदा आनंदी राहण्यासाठी तसेच अन्य आत्म्यांना निर्भेळ आनंद प्राप्त करवून देण्यासाठी हास्य विनोद करण्याची कला असणे आवश्यक आहे. अतिरिक्त गंभीरपणा स्वतःच्या व दुसऱ्याच्या जीवनाला रुक्ष बनवितो. मौन आचरणात आणणारी व्यक्ती निराश तर नाही ना असा आभास होतो म्हणून मौनाच्या वेळी चेहरा हर्षितमुख ठेवावा. परिवारातील व्यक्तींनी थोडेफार विनोदी व्यक्तव्य करून परिवाराला एखाद्या उमलत्या फुलाप्रमाणे अर्थात आनंदी ठेवावे. दुःखाचा विसर पडावा महणून कलियुगी मनुष्य चित्रपट व दूरचित्रवाणीवरील विनोदी कलाकारांचे कार्यक्रम आवर्जुन पहातो. हास्य विनोदाचा हा अर्थ नाही की, अभद्र, कामुक व दर्जाहीन भाषेचा प्रयोग करावा. विनोद असा असावा की, कोणाच्याही भावना दुखविल्या जाता कामा नये. कोणाच्याही मानसिक कमजोरीवर अथवा पंगुत्वावर विनोद करू नयेत. **परमात्म्याने रमणिक व्हायला अवश्य सांगितले आहे. साकार मिलनाच्यावेळी परमात्माही ब्रह्मावत्सांच्या सन्मुख हसविणाऱ्या महावाक्यांचे प्रयोग अवश्य करतात. अधिक हास्य हे बाह्यमुखतेत व देहाभिमानात आणून काही काळापुरते आत्मिक पतन करू शकते. रावणी हास्य हे श्रीमताच्या विपरित आहे.** ब्रह्मावत्सांनी आपल्या प्रवचनात शिष्टता, सज्जनता व मर्यादांचे भान ठेवून प्रवचन करावे. विनोद करताना एखाद्या खटकणाऱ्या शब्दाचा समाजात ऊहापोह होऊ शकतो.

**१५) पालना करण्याची कला –** लौकिक मातापिता आपल्या मुलांची पालना ह्यासाठी करीत असतात की, त्यांचे शरीर स्वस्थ व आरोग्यदायी रहावे. तसेच त्या मुलांनी बुद्धिमान व सुसंस्कारित होऊन त्यांनी उच्चप्रतीचे शिक्षण घ्यावे. ह्याच शिक्षणाद्वारे त्यांनी एखादी शैक्षणिक पदवी प्राप्त करावी ह्याच पदवीद्वारे त्यांनी एखादा व्यवसाय अथवा मोठ्या पगाराची नोकरी करावी व त्यांची गृहस्थी समृद्ध व्हावी. तद्वतच आपण एखाद्या जिज्ञासूच्या मनात ज्ञानरुपी बीज पेरून परमात्म्याचा परिचय देतो. त्यावेळी ज्ञान व परमात्म्यावरील निश्चय प्राप्त करवून, अनेक प्रकारच्या प्रतिकुल परिस्थिती पासून त्याला सुरक्षित ठेवणे आवश्यक असते. केवळ साप्ताहिकी पाठ्यक्रम पूर्ण करून कोणी खऱ्या अर्थाने ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी बनत नाहीत. त्यासाठी किमान तीन महिने तरी नियमितपणे ज्ञान मुरली श्रवण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय समर्पण भाव निर्माण होऊ शकत नाही. निश्चय व समर्पण भावामुळेच त्याला परिपूर्ण वारसा हक्क प्राप्त होऊ शकतो. जिज्ञासूंच्या आत्मोन्नतीसाठी पुढील पालनेवर लक्ष केंद्रित करावे. १) स्थूल व सूक्ष्म पुरुषार्थासाठी त्यांच्यात उमंग उत्साह भरणे. २) राजयोगाची यथार्थ विधी साध्य व्हावी म्हणून योग कॉमेंट्रीसहित करून घ्यावा. ३) शक्य झाल्यास त्यांना महारथींच्या संपर्कात आणावे. ४) त्यांच्या प्रश्नांची यथार्थ

व समाधानकारक उत्तरे द्यावीत. ५) त्यांना मधुबनला तर घेऊन जावेच ह्याशिवाय विद्यालयाच्या लहान मोठ्या कार्यक्रमास घेऊन जावे. ६) काही दिवस त्यांना प्रतिदिन योगदान करावे. ज्या राजयोग्याला युक्तियुक्त व ज्ञानयुक्त पालना करण्याची कला प्राप्त झाली आहे तो जिज्ञासूंना मायेच्या बंधनातून मुक्त करून अतिंद्रिय सुखाची प्राप्ती करवून देतो, अशा राजयोग्याला त्या आत्म्यांच्याद्वारे दुवा प्राप्त होतात. तसेच परमात्मा त्याला वरदानांनी भरपूर करतो. पालनाच्या कलेद्वारा त्याला पालनेचे प्रतिक असलेल्या श्री विष्णुप्रमाणे सत्ययुगात उच्च असे देवत्वपद प्राप्त होते.

**१६) शरीर तंदुरुस्त ठेवण्याची कला –** ज्ञानी तू आत्मा तोच आहे जो आत्म्याच्या व शरीराच्या निर्विकारीपणाला जाणून दोन्हींनाही तंदुरुस्त ठेवतो. शारीरिक विकार अर्थात काही व्याधी होऊन शरीर कमजोर झाल्याने साधकाला सेवा करण्याची इच्छा असूनही ती करता येत नाही. तसेच योगसाधनेत व्यत्यय येऊन परमात्म्याशी योग लागण्याऐवजी सदरहू व्याधीशी योग लागतो. फलस्वरुप अशरीरी स्थिती बनण्यात फार मोठी बाधा निर्माण होते. शारीरिक स्वास्थ्य ठीक नसतानाही जो राजयोगी यथार्थ व विधीपूर्वक साधना करतो तो महान होय! अर्थात असा साधक जाणतो की, 'परमात्मा मज आत्म्याला शीघ्र गतीने पावन करणार असल्याने नियमित योगाबरोबरच कर्मभोगाच्याद्वारेही मी आत्मा पावन होत आहे. ह्याचे मूर्तिमंत उदाहरण मम्मा, बाबांचे आहे.' म्हणून तर त्यांना सत्ययुगात नं.१ श्री लक्ष्मी नारायणाचे पद प्राप्त होणार आहे.

असे म्हटले जाते की, 'खुशी जैसी खुराक नही' म्हणून चिंतेला चिते समान मानतात. भय हा देखील एक मनोविकारच आहे. सततच्या भयामुळे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य मनुष्य गमावून बसतो. भय मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकते. चिंता व भय मनात असताना ग्रहण केलेले भोजन विकृत रुप घेते. 'भय' हा मनोविकार हृदय व मेंदूला कमजोर बनवितो. भोजनात सर्व व्हिटॅमिन असतील परंतु खुशीरुपी व्हिटॅमिन नसेल तर शरीर स्वास्थ्य प्राप्त होऊ शकत नाही. ब्रह्मावत्स देखील त्याचवेळी खुश राहू शकतो ज्यावेळी तो १) परमात्म्यावर व ड्राम्यावर पूर्णतः निश्चय ठेवेल. २) वर्तमानात व भविष्यात जे होईल ते उत्तमच होईल. ३) तो कर्मांच्या गहन गतीचे ज्ञान प्राप्त करून आपला आत्मोन्नतीचा पुरुषार्थ निरंतर करीत राहील.

**सात्विक भोजन ग्रहण केल्याने शरीर स्वास्थ्य ठीक राहण्यास मदत होते. स्वयंपाक करतानाही तो परमात्म्यासाठी व परमात्म्याच्या स्मृतीत करावा. असे अन्न ग्रहण करताना बापदादांशी रुह रिहान (वार्तालाप) करावे. अन्न व पाणी परमात्म्याच्या लाईट व माईटद्वारा चार्ज केल्यास त्याचा शरीरावर उत्तम परिणाम होतो.** ज्या मनुष्यात्म्याचे विचार सकारात्मक आहेत त्याच्या शरीरात स्फूर्ती व हलकेपणा राहतो. निराश व सदा असंतुष्ट असणारा मनुष्य आपल्या शरीर स्वास्थ्याला बिघडवून टाकतो. तो आपल्याच मनाला नकारात्मक विचारांचे काटे लावून दुःखी होतो. अशा मनुष्यात्माने पुढील चिंतन करावे – १) माझे कल्याण होणारच आहे. २) माझा साथी परमात्मा असल्याने कसल्याही प्रकारची माया माझ्या जीवनात व्यत्यय आणू शकत नाही. ३) ज्यावेळी जी घटना होईल त्याचवेळी त्याचा विचार करावा. ४) माझे कर्तव्य आहे की, परमात्म्याने दिलेल्या महान लक्ष्याला प्राप्त करणे. ५) मज आत्म्याचे जीवन हिरेतुल्य बनल्यामुळे कल्याणकारी व सकारात्मक चिंतनाची कला प्राप्त होऊन हा शरीररथही ठीक होईल.

बंधुनो, ह्या सोळा कला व पवित्रतेच्या सोळा कलांनी आत्म्याला संपन्न अर्थात सतोप्रधान बनवायचे आहे. त्यासाठी अधिक दोन कला ह्या संगमयुगावर प्राप्त करून एव्हर रेडी व्हावे. १) संबंध संपर्कात येत असताना आत्मिक व अलौकिक दृष्टीद्वारा आत्माभिमानी स्थिती प्राप्त करावी व २) योगसाधना करीत असताना अशरीरी स्थिती प्राप्त करून परमात्म मिलनाची व त्याची शक्तिशाली व पावन बनविणारी अद्भूत किरणे आत्म्यात

सामावून घेण्याची कला प्राप्त करावी. सदरहू दोन कलांचा उपयोग आपल्याला महाविनाशाच्या वेळी निश्चितपणे होईल. बंधुनो, महाविनाश ही आपली अंतिम परीक्षा असेल. ह्या अंतिम परिक्षेतही सफलता प्राप्त करणे अत्यावश्यक आहे. अर्थात 'अंतमते सो गती' होवूनच आपली सद्‌गती होणार आहे. संगमयुगावर ज्या पाच मनोविकारावर संपूर्ण विजय प्राप्त केला होता त्या मनोविकारांची सत्ययुगात पूर्णतः विस्मृति होईल. शारीरिक व आत्मिक दृष्ट्या संपूर्ण निर्विकारी असलेल्या देवतांना कामविकारासारखे भ्रष्ट व कनिष्ठ कर्म कसे केले जाते हे जर स्मृतीत आले तर कमलपुष्प समान पवित्र असलेले त्यांचे मन अपवित्र होणार नाही काय? ह्या कामविकारानेच श्रेष्ठाचारी देवतांचे दोन्ही मुगुट हिरावून घेतले होते. असा हा कामविकार सर्व मनुष्यात्म्यांचा महाशत्रू आहे तर त्रेतायुगाच्या अंताला देवत्त्वपद गमविणाऱ्या ३३ कोटी देवतांचा अर्थात ब्रह्मावत्सांचा डबल महाशत्रू आहे. बंधुनो, चार युगांच्या ह्या चक्रात स्मृती आणि विस्मृतीची क्रिडा अपरिहार्य आहे. ज्याप्रमाणे सत्ययुगी देवी देवतांना पाच मनोविकारांची विस्मृती होऊन अविद्या होते. तद्वतच समस्त ब्रह्मावत्सांनाही अत्यल्प काळातच ह्या विकारांची अविद्या होणार आहे. पुढील २५०० वर्षात देहाभिमान व पाच मनोविकार निर्माण होणारच नाहीत अशी पालना व व्यवस्थापन परमात्मा ह्या संगमयुगावर करून ठेवतो. **परमात्म्याच्या प्रदीर्घ काळाच्या कार्याचे अवलोकन केल्यास त्याच्या विषयी नितांत आदर व प्रेम निर्माण होऊन हाच आवाज अंतरात्म्यात उमटतो की 'उपकार तुम्हारा बाबा किन शब्दो में गाऊँ? धन्य आहेत ते शिवबाबा, ब्रह्माबाबा व धन्य आहेत त्यांची पालना प्राप्त करणारे आपण सारे ब्रह्मावत्स!**

***

---

**(पान क्र. १३ वरून)**

नाही. सतत अभ्यासाद्वारे कला अर्जित करुन विश्व विख्यात होणे अशक्य नाही. परंतु पुरुषार्थ करुन प्राप्त झालेल्या सिध्दी-प्रसिध्दी-उपाधीस अभिमानी होऊन पुन्हा-पुन्हा वर्णन न करता, नम्र-निरंहकारी बनणे मात्र फारच अवघड! जो इसम विद्वान-बुध्दिवान, रुपवान-गुणवान, धनवान-बलवान होऊन ही वाणीत त्याचा दर्प भासू देत नाही वा व्यवहारात दंभ दाखवित नाही, तसेच प्राप्तीचे श्रेय स्वतः न घेता, प्रत्येक कला-गुण, विद्या-विशेषतांना ईश्वराची कृपा मानतो, असा विनम्र मनुष्यच खऱ्या अर्थाने जीवनात यशस्वी होतो. ''लोकासांगे ब्रह्मज्ञान, आणि स्वतः मात्र कोरडा पाषाण'' ह्या म्हणी प्रमाणे जर ज्ञान आचरणात न आणता, निव्वळ भाषणबाजी किंवा पोपटपंची केली तर जगात हसू होते. विविध विद्यांचा ज्ञाता होऊन ही अहंकार गेला नाही. अहंकारी बनून विद्वतेचा गर्व केला, विद्येची घमेंड केली तर अहंकाराने दुषित झालेल्या वाणीने वेळप्रसंगी जगात थू-थू ही होते. **परिस्थितींच्या अग्निपरिक्षेतून तावून सुलाखून निघाल्यावर, व्यवहाराच्या कसोटीतून मिळवलेले, नम्रतापूर्वक सांगितलेले अनुभवयुक्त अनमोल ज्ञान व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला सौंदर्य प्रदान करतं. विद्या विनम्रतेने वर्णन केली तरच विद्वान-विद्यापतीच्या आदर्श आचरणाला शोभा ही देते, म्हणूनच म्हटलं ही जातं, ''विद्या विनयेन शोभते.''**

***

---

*अमृतकुंभाच्या सर्व वाचकांना गुढीपाडवा व मराठी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!*
*नूतन वर्ष आपणा सर्वांना सुख, शांती व समृद्धीचे जावो,*
*हीच मंगल कामना!*

**- ब्र. कु. गोदावरी दीदी,**
**प्रकाशक**





ब्रह्मावत्सांकरिता

# ब्रह्मावत्सांचे श्रेष्ठतम कर्तव्य

**ब्रह्माकुमार चंद्रशेखर, शांतिवन (आबू रोड)**

ब्रह्मावत्सांचे पहिले कर्तव्य आहे सर्वांना स्व-स्वरुपात (आत्मिक स्वरुपात) व स्वधर्मात (पवित्रता) स्थित करणे. जसे लौकिक मध्ये कोणी आपले कर्तव्य कधी विसरत नाही. समजा कुणी एखादी डॉक्टर असेल तर चालता-फिरतांना, खाता-पितांना, प्रत्येक कर्म करतांना तो आपले डॉक्टरीचे कर्तव्य विसरत नाही. **तसेच आपले ब्रह्मावत्सांचे कर्तव्य आहे - सर्व आत्म्यांना स्व-स्वरुपात व स्वधर्मात स्थित करणे, ते आपण कधीही विसरता कामा नये. परंतु जेव्हा आपण स्वतः स्व-स्थितीत वा स्व-स्मृतीत स्थित राहू तेव्हाच आपण अन्य आत्म्यांना स्थित करू शकू.** तात्पर्य म्हणजे संगमयुगात आपण सर्व ब्रह्मावत्स, शिवबाबांच्या समवेत याच कर्तव्यासाठी निमित्त आहोत. त्यामुळे रोज हे चेक करा की आपण आपले हे कर्तव्य किती प्रमाणात केले. दैनंदिन जीवनात जितके आपण हे कर्तव्य करु तितकाच आपला ब्राह्मण जन्म सफल होईल.

**मुक्ती-जीवनमुक्ती धामचे गेट-पास देणे**

प्रत्येक आत्म्याची बऱ्याच काळाची मुक्तिधाममध्ये अर्थात आपल्या घरी जाण्याची इच्छा आहे. ती इच्छा पूर्ण करण्याचे कर्तव्य आपले ब्रह्मावत्सांचे आहे. त्यासाठी सर्वप्रथम आपल्या ब्राह्मण जीवनात मुक्ती-जीवनमुक्तीचा अनुभव करा. जोपर्यंत आपण स्वतः याचा अनुभव करीत नाही तोपर्यंत दुसऱ्यांना कसा करविणार? मुक्ती व जीवनमुक्तीचा अनुभव आता संगमयुगातच होतो. कारण मुक्तिधाममध्ये आत्म्याला कुठलाही अनुभव होत नाही. जीवनमुक्ती धाममध्ये (अर्थात स्वर्गात) जीवनबंध काय असतो, याची अविद्या असते. तात्पर्य म्हणजे जेव्हा आपण स्वतः मुक्ती व जीवनमुक्तीचे अनुभवी बनू तेव्हाच आपण अन्य आत्म्यांना मुक्ती अर्थात आपल्या घरी (परमधाममध्ये) व जीवनमुक्ती अर्थात आपल्या राज्यात (स्वर्गात) येण्याचा गेट-पास देऊ शकू. जोपर्यंत आपण ब्रह्मावत्स कुणा आत्म्याला गेट-पास देत नाही तोपर्यंत तो गेट पास करू शकणार नाही. **अंतिम समयी मुक्ती-जीवनमुक्तिधामचे गेट-पास घेणाऱ्यांच्या मोठ्या रांगा आपल्यापुढे लागतील. जर आपण गेट-पास देण्यासाठी उशिर केला तर समय 'टू लेट' होऊन जाईल. म्हणून सदैव आपल्या स्व-स्वरुपात व स्वधर्मात स्थित राहून, एक सेकंदात कुठल्याही आत्म्याला संतुष्ट अथवा भरपूर करा.** आपल्या कल्याणकारी वृत्तीद्वारे, त्यांना यथार्थ स्मृती देऊन मुक्ती, जीवनमुक्ती धामचे गेट-पास देऊ शकता. बिचारे अनेक आत्मे, केवळ १ सेकंदात त्यांच्या अनेक जन्माची आशा पूर्ण करण्याचे दान मागण्यासाठी आपल्याकडे येतील. त्यासाठी सर्वशक्तींचा स्टॉक जमा करा, ज्याद्वारे मास्टर सर्वशक्तिवान बनून १ सेकंदाच्या विधीद्वारे त्या आत्म्यांना सिद्धी (अर्थात सद्‌गती) प्रदान करु शकाल. आता अशा सेवेची आवश्यकता आहे. त्यामुळे असे ईश्वरीय सेवाधारी बना.

**तडपणाऱ्या व थकलेल्या आत्म्यांना सिद्धी (अर्थात सद्‌गती) प्राप्त करविणे-**

आपल्या डोळ्यातील ईश्वरीय नशा अनेकांच्या सेवेसाठी निमित्त बनला पहिजे कारण आत्मे अनेक जन्मात विविध प्रकारच्या साधना करून थकले आहेत. आता त्यांना सिद्धी हवी आहे, साधना नको आहे. सिद्धी अर्थात

सद्गती हवी आहे. अशा तडपणाऱ्या व थकलेल्या आत्म्यांची आशा ब्रह्मावत्सांशिवाय कोण पूर्ण करू शकेल? प्रत्येक कल्पात आपणच त्यासाठी निमित्त बनलो होतो. त्यामुळे अनेकदा आपण केलेले हे कर्तव्य आठवा.

जितकी जितकी आपली स्थिती श्रेष्ठ बनत जाईल तितकी आत्म्यांची पुकार, तडपणाऱ्या व थकलेल्या आत्म्यांचे चेहरे स्पष्ट दिसू लागतील. **जसे स्थापनेच्या आदि काळात साकार ब्रह्माबाबांचे उदाहरण आपण पाहिले आहे. तशीच आपल्याला सुद्धा आत्म्यांना सद्गती देण्याची तळमळ वा ओढ (लगन) लागली पाहिजे.** म्हणजे मग आपला जो लहान-सहान गोष्टीत वेळ वाया जातो तो जाणार नाही. तात्पर्य म्हणजे आता बेहदमध्ये स्थित रहा म्हणजे हदच्या गोष्टी आपोआप समाप्त होतील. हदच्या गोष्टीत वेळ घालवणे म्हणजे जणू बाहुल्यांचा खेळ खेळण्यासारखे आहे.

**बेहदच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घ्या –**

आपला ब्रह्मावत्सांचा अलौकिक जन्म झालाच आहे मुळी बेहदच्या कार्यासाठी. जर अलौकिक ब्राह्मण जन्मातही आपण लौकिक कार्य करत राहिलो तर अलौकिक जन्माचा काय फायदा झाला? त्यामुळे आपला ब्राह्मण जन्म आणि समयाचे महत्त्व ओळखा तरच आपल्या हातून महान कर्तव्य होईल.

**सारे संघटन एकरस स्थितीत स्थित करविण्यासाठी सहयोगी बरा –**

प्रत्येक ब्राह्मणाची केवळ स्वतःला एकरस बनविण्याची जबाबदारी नाही. तर साऱ्या संघटनाला एकरस स्थितीत स्थित करविण्यासाठी सहयोगी बनायचे आहे. परंतु संघटनामध्ये तसेच माळेत एक मणका जरी भिन्न प्रकारचा असला तरी माळा शोभून दिसत नाही. **तात्पर्य म्हणजे संघटनाची शक्ती हीच परमात्म ज्ञानाची विशेषता आहे. त्यामुळेच परमात्मा शिव पित्याने स्थापन केलेल्या स्वर्गाविषयी गायन केले जाते – 'एक धर्म', 'एक भाषा', 'एक राज्य', 'एक मत'**. संगमयुगी ब्राह्मण संघटनाची विशेषता देवता रुपात प्रॅक्टीकलमध्ये दिसून येते.

**आपल्या वायब्रेशन्स (प्रकंपन) द्वारे वायुमंडळ परिवर्तन करा –**

विश्व परिवर्तनाच्या संपूर्ण कार्याची समाप्ती ही संघटित रुपात एकच वृत्ती व वायब्रेशन द्वारे होईल. थोड्याशा महान आत्म्यांच्या किंवा तीव्र पुरुषार्थी महारथींच्या वृत्ती व वायब्रेशन्स द्वारे कधी-कधी सफलता होते. परंतु आता अंतिम समयी सर्व ब्राह्मण आत्म्यांच्या एकच वृत्तीची अंगुली पाहिजे. एकच संकल्पाची अंगुली पाहिजे. तरच बेहदचे विश्व परिवर्तन होईल. वर्तमान समयी विशेष अभ्यास याच गोष्टीचा पाहिजे.

जशी एखादी सुगंधित वस्तू सेकंदात आपला सुगंध पसरविते. समजा गुलाबाचा इसेन्स टाकला तर सेकंदात वायुमंडलमध्ये गुलाबाचा सुगंध पसरतो. तसाच आपण शांतीचा, आनंदाचा, प्रेमाचा, भिन्न-भिन्न शक्तींचा इसेन्स संघटित रुपाने पसरवला पाहिजे. ज्या प्रकारचा इसेन्स आपण पसरवू त्याचा अनुभव अन्य आत्म्यांनाही आला पाहिजे. जसे एखादी अशांत आत्म्याला जर शांती मिळाली तर जणू तहानलेल्या आत्म्याला पाणी मिळाल्यासारखे आहे. त्यामुळे त्याचे डोळे उघडतील. समजा आनंदाचा इसेन्स पसरविला तर एखाद्या आंधळ्याला तिसरा नेत्र मिळाल्यासाखे वाटेल. त्याची अज्ञानाची मूर्च्छा दूर होईल व त्याचे याकडे लक्ष जाईल की येथे कोणी तरी परमपूज्य आत्मे आहेत. त्यामुळे आता अशी आत्मिक ड्रील करा.

**अपकारी वर उपकार करा –**

अपकारी वर उपकार करणे, हेच ब्राह्मणांचे कर्तव्य आहे. कोणी जरी आपल्याला शिवीगाळ केली तरी त्याला प्रेमाने जवळ करा ही खरी कमाल आहे. यालाच परिवर्तन म्हटले जाते. प्रेमाने जवळ करणाऱ्याला प्रेमाने भेटणे, ही काही मोठी गोष्ट नाही. परंतु आपली निंदा करणाऱ्याला मनाने आपला मित्र मानणे, ही मोठी गोष्ट आहे. जेव्हा अशाप्रकारचे आपल्यात परिवर्तन होईल तेव्हा ब्राह्मण संघटन विश्वासमोर प्रसिद्ध होईल. दुनिया ज्या गोष्टीला असंभव समजते, ती प्रॅक्टीकलमध्ये करून दाखवणे, ही आहे खरी कमाल.

**लाइट हाऊस बनून आत्म्यांना रस्ता दाखवा –**

जे सदैव एक शिवबाबांवर भरोसा (विश्वास) ठेऊन रहातात ते सदैव एकरस स्थितीचा अनुभव करतात. अशा आत्म्यांना अन्य कुठलाच रस आकर्षित करु शकत नाही. ते सदा स्वयं लाइट हाऊस बनून, निर्विघ्नपणे चालत असतात तसेच अनेकांना रस्ता दाखविण्यासाठी निमित्त बनतात. त्यामुळे हे चेक करा की मी रोज किती आत्म्यांना लाइट हाऊस बनून रस्ता दाखवला. हेच वास्तविक ब्रह्मावत्सांचे कर्तव्य आहे. हाच आपला धंदा अथवा व्यवहार आहे.

**समयानुसार आता महातपस्वी बना –**

आपल्या संघटित तपस्येच्या आत्मिक ज्वालेने सर्व आत्म्यांना दुःख, अशांती पासून मुक्त करण्याचे महान कर्तव्य करण्याचा हा समय आहे. जसे एका बाजूने 'खुने नाहक खेल' (विनाकारण अकस्मात मृत्युचा खेळ) वाढत चालला आहे. परिणामतः सर्व आत्मे स्वतःला बेसहारा अनुभव करीत आहेत. अशावेळी त्यांना सहाऱ्याचा अनुभव करविण्यासाठी निमित्त आपण महातपस्वी आत्मे आहोत. आपल्या तपस्वी स्वरुपाद्वारे सर्व आत्म्यांना आत्मिक सुख-चैन अनुभवाला येईल. वर्तमान समयी विश्वातील सर्व आत्मे प्रकृतीमुळे, वायुमंडलमुळे, मनुष्य आत्म्यांमुळे, आपल्या मनाच्या कमजोरीमुळे, शरीरामुळे बेचैन वा दुःखी आहेत. अशा आत्म्यांना सुखमय स्थितीचा एक संकंदाचा अनुभव करविल्यामुळे, ते आपल्याला मनापासून धन्यवाद देतील. त्यामुळे आता समयानुसार संघटित रुपात ज्वाला स्वरुप तपस्येची आवश्यकता आहे. अशा तपस्येद्वारे शांतीच्या शक्तीची किरणे चोहीकडे पसरत असल्याचा अनुभव होईल.

जसे सूर्यापासून विश्वाला प्रकाश व अनेक विनाशी प्राप्तींची अनुभूती होते. तसेच महान तपस्वींद्वारे प्राप्तीची किरणे अनेकांना अनुभवाला येतात. **तात्पर्य म्हणजे तपस्वी स्वरुप हे दुसऱ्यांना देण्याचे स्वरुप आहे. त्यामुळे रोज हे चेक करा की मला प्राप्त ईश्वरीय खजिने (उदा. खुशीचा, शांतीचा, शक्तीचा, ज्ञानाचा, गुणांचा, सहयोगाचा) किती आत्म्यांना वाटले. अशारीतीने महातपस्वी बनणे अर्थात विश्व कल्याणकारी बनणे. वर्तमान समयी ब्रह्मावत्सांचे हेच श्रेष्ठतम कर्तव्य आहे.**

(संदर्भ पुस्तक : 'वाह रे मैं ब्राह्मण आत्मा')

***

---

(पान क्र. १० वरून)

अंतिम समयी सर्वांच्याच मनात वैराग्याची भावना उत्पन्न होईल. परंतु परिस्थितीनुरुप आलेल्या वैराग्याचे फळ मात्र मिळत नाही. या अनुषंगाने दि. १३ डिसेंबर १९९० च्या अव्यक्त मुरलीतील महावाक्ये अतिशय उद्‌बोधक आहेत – **"दुनियावालों को बेहदका वैराग्य समय करायेगा और समय पर मजबुरी से करेंगे। बच्चोंको बाप समय से पहले तैयार करते है और बाप की मोहब्बत से करते हो। बेहद का वैराग्य धारण करना ही होगा लेकिन मजबूरी से करने का फल नही मिलता। मोहब्बत से करने का प्रत्यक्ष फल और भविष्य फल बनता है।"** शिवबाबांची ही महावाक्ये लक्षात होऊन आता आपण बेहदचे वैरागी बनू या.

भावानुवाद : बी. के. मिनल
ठाणे (पश्चिम)

(पान क्र. १८ वरून)

**यावरुन आपल्या लक्षात आले असेल की जर आपला बुद्धियोग शिवबाबांशी असेल तर सदैव प्रसन्नता अनुभवाला येईल. आपला संग चांगला असेल तर प्रसन्नता टिकून राहिल. आत्म्यावर विकर्मांचे ओझे नसेल तर प्रसन्नता अनुभवाला येईल. तसेच जो दाता बनून सदा ज्ञान, गुण व शक्ती देत राहिल तो सदा प्रसन्न राहिल. त्याचबरोबर जो स्वतः प्रसन्न राहतो, तोच इतरांच्या बाबतीत व सेवेच्या बाबतीतही प्रसन्न राहतो. तात्पर्य म्हणजे सर्वात मोठी सेवा ही आपल्या प्रसन्नमूर्तीद्वारे होते. मुख्य म्हणजे जो आत्मिक ड्रील (योग) व शारीरिक व्यायाम करेल त्याचे तन व मन दोन्ही सदा स्वस्थ राहतील. फलस्वरुप सदा प्रसन्नता अनुभवाला येईल.**

***



# नैतिक शिक्षण हीच खरी काळाची गरज

**ब्र. कु. भगवान भाई, शांतिवन (आबू रोड)**

**आदरणीय ब्रह्माकुमार भगवान भाई हे अमृतकुंभ द्वैमासिकाचे नियमित लेखक असल्याने, सर्व वाचक वर्ग त्यांच्याशी चांगलाच परिचित आहे. मधुबन त्यांची कर्मभूमी असली तरी भारतात व नेपाळमध्ये वरचेवर ते सेवार्थ भ्रमण करीत असतात. त्यांनी इ.स. २०१० पर्यंत ५००० शाळा कॉलेजातून आणि ८०० तुरुंगातून नैतिक शिक्षणाचे धडे दिल्यामुळे त्यांचे नाव ''इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'' मध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे. त्यानंतरही त्यांचे हे कार्य अव्याहतपणे चालू आहे. त्याग, तपस्या व सेवा हाच त्यांच्या जीवनाचा आधार आहे. अतिशय 'सिंपल' व 'सँपल' तसेच 'एकनामी' व 'इकॉनॉमी' या त्यांच्या मुख्य विशेषता आहेत. ईश्वरीय सेवा हाच त्यांचा श्वास व ध्यास आहे. त्यांनी आपल्या स्वानुभवावर आधारित लिहिलेला सदरचा हा लेख वाचकांना नक्कीच आवडेल.– संपादक**

**विद्यार्थी जीवनाचा काळ हा सर्वश्रेष्ठ काळ असे म्हटले जाते. (Student Life is the best Life) त्या काळात जितके आपण जागृत वा सजग राहून त्याचा सदुपयोग करु तितके आपले जीवन उत्कर्षाचे, भरभराटीचे व आनंदमय बनते.** विद्यार्थी जीवनाचा एक-एक क्षण सद्गुणांच्या संग्रहासाठी उपयोगात आणावयाचा असतो. तरच आपले भविष्य जीवन उत्तम, स्वस्थ तसेच समाजासाठी उपयोगी बनू शकते. (परंतु सद्यस्थितीत मात्र निरनिराळ्या विद्यापीठातून चाललेली विद्यार्थी आंदोलने सरकारपुढे आव्हान ठरत आहेत. विद्यापीठांना जणू राजकीय आखाड्यांचे स्वरुप प्राप्त झाले आहे. ही फार मोठी चिंतेची बाब आहे.) तात्पर्य म्हणजे विद्यार्थी जीवनात जर आपण गुणवान, चरित्रवान बनलो तरच भविष्यात राष्ट्राच्या उत्थानासाठी, विश्व परिवर्तनासाठी निमित्त बनू शकतो. वर्तमान समयी अशा चरित्रवान नागरिकांची राष्ट्राला खरी आवश्यकता आहे. आजचा युवक हाच भविष्यातील राष्ट्राचा खरा शिल्पकार आहे. त्यामुळेच आजच्या युवकांना नैतिक, चारित्रिक व आध्यात्मिक शिक्षण देऊन सुसंस्कारीत बनविणे, ही काळाची खरी गरज आहे.

वास्तविक शिक्षण हे जीवनरुपी वृक्षाचे बीज आहे. हे बीज जसे असेल त्यानुसार जीवनाचा वृक्ष साकार होईल. म्हणूनच शिक्षणाचे बीज हे अतिशय उत्तम असले पाहिजे तरच जीवनरुपी वृक्षाला सत्यता, नम्रता, धैर्यता, मधुरता, सहनशीलता, हर्षितमुखता, प्रसन्नता इत्यादी गुणरुपी फळे येतील. तसे पाहिले तर शिक्षणाचा मूळ उद्देश आहे – **अज्ञान अंधःकारातून ज्ञान प्रकाशाकडे जाणे, सर्व प्रकारच्या व्यसनांपासून तसेच विकारांपासून मुक्त बनणे, दैवीगुण संपन्न बनणे, स्वतःबरोबरच दुसऱ्यांचे जीवन सुख-शांतीमय बनवणे, ज्ञान अमृत प्राशन करून जीवन अमर (अर्थात किर्तीमान) बनविणे, ज्ञानाचा जरासुद्धा अहंकार न करता, नम्रतापूर्वक जीवन व्यतीत करणे.**

परंतु वर्तमान समयी आपण शिक्षित समाजाची स्थिती पहात आहोत. समाजामध्ये लोक शिक्षित झाल्यानंतर सुद्धा अपराध वा गुन्ह्यांचे प्रमाण वाढतच चालले आहे. इतकेच नव्हे तर व्यसन, नशा, आत्महत्या, खून, खटले, संबंधातील कटुता, वैर-वैमनस्य या सर्व गोष्टी दिवसेंदिवस वाढत आहेत. लोकांच्या मनातील ताणतणाव

पराकोटीला पोचला आहे. मनुष्यातील कामक्रोधादि विकारांमुळे सारा संसार नर्कमय बनला आहे. कोर्ट, कचेरी, पोलिस स्टेशन्स्, जेल, हॉस्पिटल या गोष्टी वाढत आहे. या सर्वांचे मूळ कारण आहे - नैतिक शिक्षणाचा अभाव.

शाळा-कॉलेजात शिक्षण घेतल्यानंतरच तरुण वर्ग समाजाच्या निरनिराळ्या क्षेत्रात कार्यरत होतात. त्यामुळे जर समाजाच्या सर्वच क्षेत्रांना सुधारायचे असेल तर शाळा-कॉलेजमध्येच मुलांना नैतिक व आध्यात्मिक शिक्षण देऊन त्यांना सुसंस्कारीत बनवणे, ही काळाची गरज आहे. सध्या शाळा-कॉलेजमध्ये मुलांना केवळ नोकरी प्राप्त करण्यासाठी अथवा उदर निर्वाह करण्यासाठी शिकवले जाते. परंतु केवळ पोट भरणे, रोजगार प्राप्त करणे हा शिक्षणाचा उद्देश नसून, विद्यार्थ्यांना सुसंस्कारीत बनवणे, हा खरा उद्देश आहे. त्यासाठी नैतिक शिक्षण आवश्यक आहे.

नैतिक शिक्षणामुळेच मानव मनामध्ये बदल घडून येतो. मानवाच्या व्यवहाराचा प्रभाव प्रकृतीवर सुद्धा पडत असतो. जर मानव असाच संस्कारहीन बनत राहिला तर माणसाचा नकारात्मक व्यवहार असाच वाढत जाऊन, प्रकृती दिवसेंदिवस तमोप्रधान बनत जाईल. त्यातूनच प्राकृतिक आपदा निर्माण होऊन सृष्टीवर महाभारी विनाश होईल. 'जसा मानव तशी प्रकृती' हा एक निसर्गाचा नियम आहे. संस्काराचा तसेच चारित्र्याचा मूळ आधार आत्म अनुशासन अर्थात मन आणि इंद्रियांवर संयम ठेवणे हा आहे. विद्यार्थी जीवनात मन आणि इंद्रियांवर संयम ठेवणाराच भावी जीवनात सद्‌गुणी, समाज उपयोगी व आदर्श नागरीक बनू शकतो. आजचा मानव फक्त भौतिक विकासामागे धावत आहे. चरित्राचा विकास करण्याकडे त्याचे दुर्लक्ष होत आहे. परिणामतः भौतिक विकास होऊनही मानव जीवनात सुख-शांती अनुभवाला येत नाही. **याउलट सत्य व त्रेता युगातील मानव हा दैवीगुण संपन्न देव मानव (अर्थात देवी-देवता) होता. सुसंस्कारीत होता, सत्त्व प्रधान होता. त्यामुळे तेथील प्रकृती व प्राणीसुद्धा सत्त्वप्रधान होते. इतकेच नव्हे तर आपसात निस्वार्थ प्रेम होते. प्राणीमात्रात प्रेम होते.** वाघ व बकरीसुद्धा एका घाटावर पाणी पित होते. सर्वजण सदैव आनंदी, निरोगी व संपत्तीवान होते. तात्पर्य म्हणजे निकट भविष्यात कलियुगानंतर भारतात जे सत्ययुग येणार आहे तेथे जाण्यासाठी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे दैवीगुण संपन्न अथवा सुसंस्कारीत बनणे, परम आवश्यक आहे. सत्ययुगी सृष्टीचा पाया आता संगमयुगात (कलियुगाच्या अंतसमयी) स्वयं शिव परमात्मा टाकत आहेत. त्यासाठी त्यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची स्थापना केली आहे. तसेच रोज ज्ञानमुरलीद्वारे श्रेष्ठतम ज्ञान प्रदान करीत आहेत. या ज्ञानाची धारणा केल्यानेच मानव सत्ययुगी देवता बनतो.

वर्तमान शिक्षण पद्धतीमध्ये युवकांना सकारात्मक विचारसरणीचे ज्ञान प्राप्त न झाल्याने, ते हिंसात्मक आंदोलनात भाग घेऊ लागले आहेत. वास्तविक युवकांनी आपल्या शक्तीचा वापर विश्व नवनिर्माण कार्यासाठी केला पाहिजे. यासाठी विद्यार्थी जीवनात प्रामुख्याने १) ज्ञानाचा विकास २) आचारणाची शुद्धी व ३) विचारात एकरसता या तीन गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. तरच विद्यार्थ्यांना जीवनाचा खरा अर्थ समजून, त्यांचे जीवन सफल होईल.

विद्यार्थी जीवनात जास्तीत जास्त वेळ हा ज्ञानार्जनासाठी वापरला पाहिजे. ज्ञान प्रत्यक्ष आपल्या जीवनात उतरवून उदाहरणमूर्त बनले पाहिजे. 'मरावे परी किर्तीरुपे उरावे' या उक्तीप्रमाणे आपण गेल्यानंतर सुद्धा आपले चरित्र लोकांसाठी आदर्श बनावे, हेच आपल्या जीवनाचे उद्दिष्ट असले पाहिजे. तात्पर्य म्हणजे जे युवक आपले जीवन श्रेष्ठ, सुसंस्कारीत, नम्रचित्त बनवितात तेच राष्ट्र निर्माणाच्या महान कार्यात सहयोगी बनू शकतात. याउलट जे युवक चरित्र भ्रष्ट, व्यसनाधिन रहातात, कुसंगामुळे अपराधी बनतात ते देशासाठी, समाजासाठी तसेच आई-वडिलांसाठी सुद्धा भार बनतात.

सर्व भारतीयांचे लक्ष आज युवा पिढीकडे लागले आहे. युवकांनी काहीतरी महान कार्य करावे व भारताचा सर्वांगीण विकास साधावा. विश्वात भारताला एक महाशक्ती म्हणून

प्रस्थापित करावे. अवघ्या विश्वाचा आध्यात्मिक गुरु बनावे. अशा अनेक आकांक्षा आहेत परंतु युवकांची नजर मात्र फेसबुक, व्हाटसअप, युट्यूब वरती आहे. याद्वारे जर युवकांमध्ये नकारात्मक विचारांचे अर्थात विषय-विकारांचे बीज पेरले गेले तर भावी समाज कसा असेल, याचा अंदाज सहज बांधता येईल. राष्ट्रपिता महात्मा गांधीचे हे स्वप्न होते की भारतात रामराज्याची स्थापना करावी. परंतु सध्या सगळीकडे रावणराज्याची तीव्रता वाढत असल्याचे दिसून येते. मनुष्य विषय विकारांच्या आधिन होत चालल्याने, संपूर्ण सृष्टी नर्क तुल्य बनत चालली आहे. जोपर्यंत मनुष्य कामक्रोधादी विकारांवर विजय प्राप्त करत नाही तोपर्यंत भौतिक विकाससुद्धा विश्वाला विनाशाकडेच घेऊन जाईल.

आजवर मी भारतातील तसेच नेपाळमधील शेकडो शाळा-कॉलेजांना भेटी देऊन, विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्याला सर्वांकडून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. त्याचबरोबर मी ३०० बाल सुधारग्रहांना व ८०० हून अधिक कारागृहांना भेटी दिल्या. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाद्वारे त्यांचे मनपरिवर्तनाचा प्रयत्न केला. फलस्वरुप हजारो कैदी बांधवांचे जीवन परिवर्तन झाले आहे. त्यांनी आपसातील वैरभाव सोडून, जीवन चांगल्या मार्गाने जगण्याची प्रतिज्ञा केली आहे. देशभरातील शाळा-कॉलेजात जाऊन, नैतिक शिक्षणाचे धडे देतांना, माझ्या असे लक्षात आले की विद्यार्थ्यांच्या पालकांना वाटते, मुलांवर संस्कार करण्याचे कार्य शिक्षकांचे आहे आम्ही खूप पैसे खर्च करून, मुलांना चांगल्या शाळेत घातले आहे. याउलट शिक्षक समजतात की मुलांना संस्कारीत करण्याचे कार्य आई-वडिलांचे आहे. आमचे काम फक्त शाळेचा पाठ्यक्रम शिकविण्याचे आहे. वास्तविक विद्यार्थ्यांना सुसंस्कारीत करण्याचे काम आई-वडिल, शिक्षक आणि स्वतः विद्यार्थ्याचे सुद्धा आहे. तसे पाहिले तर माता-पिता हेच मुलाचे प्रथम गुरु आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांवर जिजामाता यांनी बालपणीच श्रेष्ठ संस्कार केले महणूनच महाराष्ट्रातील मराठेशाहीचा इतिहास घडला.

आज मात्र सगळ चित्र बदललयं. लहान मूल जेव्हा रडतं तेव्हा त्याला खेळायला मोबाईल देतात किंवा टि.व्हीवर कार्टून फिल्म लावून देतात. अशाप्रकारे मुलांवर चांगले संस्कार होतील तरी कसे? बाप मुलासमोर गुटखा खातो, दारु पितो, तंबाखू खातो, मोबाईल व टि.व्ही वर अश्लील सिनेमे पहातो, घरातल्या माणसांवर आरडाओरडा करतो, लहानसहान गोष्टींवरुन मुलाला बेदम मारतो. अशा परिस्थितीत मुलावर चांगले संस्कार कसे होतील? शिक्षकांनासुद्धा आचार्य म्हणतात. आचार्य अर्थात शिक्षणाला आचरणात आणणारे. परंतु काही शाळा-कॉलेजमध्ये जणू काय 'फॅशन शो' करण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी जात असतात. अशा वातावरणात विद्यार्थी सुसंस्कारीत कसा बनणार? तात्पर्य म्हणजे सर्वप्रथम शिक्षकांनी तसेच आई-वडिलांनी आपले जीवन नैतिकता संपन्न बनविणे आवश्यक आहे. कारण विद्यार्थ्यांच्या पुढे त्यांचाच आदर्श असतो.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने असा दृढ संकल्प केला पाहिजे की मला चरित्र संपन्न जीवन घडवायच आहे. त्यासाठी एखाद्या आदर्श पुरुषाचे जीवन सतत त्याच्या दृष्टीसमोर असले पाहिजे. जसे पिताश्री ब्रह्माबाबांचे जीवन आज विश्वातील सर्व ब्रह्मावत्सांच्या समोर आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन, त्यांचे अनुकरण सर्वजण करीत आहे. सर्वांचे हेच लक्ष्य आहे की मला ब्रह्मा बापसमान बनायचे आहे. याचा परिणाम म्हणजे स्वपरिवर्तन तसेच विश्वपरिवर्तनाचे कार्य तीव्र गतीने संपन्न होण्याच्या मार्गावर आहे. आज सुमारे १४२ देशात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची सेवाकेंद्रे कार्यरत आहेत. तसेच लाखो ब्रह्माकुमार ब्रह्माकुमारी विश्व परिवर्तनाच्या महान कार्यात यथाशक्ती सहयोगी बनले आहेत. फलस्वरुप लवकरच निकट भविष्यात अर्थात सत्ययुगात दैवी स्वराज्याची स्थापना होणार आहे. तेथे देवी-देवता सर्वगुण संपन्न असतील, ज्याचा आधार आहे संगमयुगातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षण. म्हणूनच प्रत्येकाने ते प्राप्त करावे व भविष्यात स्वर्गीय सुख प्राप्त करावे. ***




# हिरेतुल्य संगमयुगात श्रीमतानुसार सर्वश्रेष्ठ आचारण करु या!

**(भाग – १)**

**ब्रह्माकुमारी उज्ज्वलाताई, पुणे**

सर्वसाधारण मनुष्य हे जाणतो की, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे क्रमाक्रमाने येणारे ऋतुचक्र अविरत चालू आहे. हिवाळा समाप्त झाला की, पुनः उन्हाळा येणे अपरिहार्य असते. हे ऋतुचक्र अनादि असल्याने भविष्यात ही असेच चालू राहणार आहे. तद्वतच **ह्या मनुष्यसृष्टीतील सत्ययुग, त्रेतायुग द्वापर युग व वर्तमान समयी चालू असलेले कलियुग ही चार युगे अनादि अनंत काळापासून कित्येक वेळा आली आहेत व गेली आहेत. वर्तमान समयीच्या कल्पाची व कलियुगाची आयुर्मर्यादा समाप्त होणार असल्याने अल्पावधीतच सत्ययुगाची स्थापना होणार हे निश्चित.** अविरत फिरणाऱ्या ह्या चार युगांच्या चक्राला कोणीही प्रतिबंध करू शकत नाही. अमृतकुंभाच्या प्रिय वाचक बंधु आणि भगिनींनो, आपण कधी हा विचार केला आहे का की, ह्या भिन्न-भिन्न युगांची अशी ही भिन्न भिन्न नावे का पडली आहेत? ह्याचे यथार्थ उत्तर हेच आहे की, भिन्न भिन्न युगातील मनुष्यात्म्यांच्या भिन्न भिन्न स्थितीनुसारच होणाऱ्या भिन्न-भिन्न आचरणाच्या कारणे चार युगांची चार भिन्न भिन्न नावे पडली आहेत. ह्या चार युगांचे प्रतीक आहे स्वस्तिकाचे शुभचिन्ह! स्वस्तिकाचे चारही भाग समान असल्याने प्रत्येक युगाचा कालावधी १२५० वर्षांचा, तर चार युगे मिळून होणाऱ्या संपूर्ण कल्पाचा कालावधी केवळ ५००० वर्षांचा आहे. ह्यापेक्षा एक मिनिट देखील कमी अथवा अधिक असत नाही. अशाप्रकारे चार युगातील महत्त्वाच्या सर्व घटना व प्रत्येक युगातील मनुष्यात्म्यांच्या स्थिती व स्थितीनुसार होणाऱ्या आचरणाचे स्पष्टीकरण परमात्म्याने दिले आहे हे स्पष्टीकरण अन्य कोणतेही मनुष्यात्मे देऊ शकत नाहीत कारण त्यांना चारही युगांचे यथार्थ ज्ञान नसते.

**ज्ञानसागर परमात्म्याच्या तुलनेत धर्मात्म्यांचे व संत महात्म्याचे आत्मबल मर्यादित असल्याने ते ना सृष्टिचक्राचे परिपूर्ण ज्ञान देऊ शकतात. ना पतित झालेल्या नर्काचा विनाश करवून, सत्ययुगी स्वर्गाची स्थापना करू शकतात.** बंधुनो, पूर्णतः पतित झालेल्या युगाला पावन युगात परिवर्तन करण्याची ताकद कोणत्याही देहधारी मनुष्यात नसून केवळ विदेही परमात्म्यातच आहे असे म्हटले जाते की, सत्ययुगानंतर त्रेतायुग येते. त्रेतायुगानंतर द्वापरयुग येते व द्वापरयुगानंतर कलियुग येते. परंतु कलियुगानंतर सत्ययुग येते असे म्हणता येणार नाही. अन्य युगे ही मनुष्यात्म्यांच्या पतनाद्वारे येत असतात. परंतु सत्ययुग मात्र सत्य परमात्म्यालाच परमधाममधून ह्या साकार सृष्टीवर अवतरित होऊन स्थापन करावे लागते. सत्ययुग स्थापन करण्याची त्याची विधी कल्पनातीत असली तरी यथार्थ आहे. प्रत्येक कल्पातील प्रत्येक सत्ययुगात दैवी महाराजा श्री नारायण व महाराणी श्री लक्ष्मी ह्यांचे दैवी प्रजेवर राज्य असते. त्या दैवी राज्यांच्या अथवा सत्ययुगाच्या स्थापनार्थ परमात्मा कलियुगाच्या अंतिम चरणातील पुरुषोत्तम संगमयुगावर ब्रह्माच्या (कलियुगातील सर्व साधारण मनुष्य) वृद्धतनात प्रवेश करून मूळ गीताज्ञान अत्यंत अद्वितीय पद्धतीने प्रदान करतो. हे ज्ञान ब्रह्मा-सरस्वती सह हजारो मनुष्य आत्मे त्याच्या सन्मुख श्रवण करतात. ह्याशिवाय ब्रह्माकुमारी विद्यालयाच्या हजारो केंद्रात लाखो मनुष्यात्मे, सत्ययुगातील देवत्वपद प्राप्त करण्याचे मूळ गीता ज्ञान श्रवण करतात. कलियुगाला 'लोहयुग' असे ही म्हटले जाते. ह्या लोहयुगात परमात्म्याच्या दृष्टिकोनातून मनुष्यात्म्यांची बुद्धिही

लोहाप्रमाणे कठीण व काळी झालेली असते. मनुष्यात्म्यांचे देवात्म्यात परिवर्तन करवून घेत असताना, परमात्म्याचा महत्वाचा आधार तर हाच आहे की ज्यांनी सत्ययुग व त्रेतायुगात देवीदेवतांचे पार्ट बजाविले होते. त्या मनुष्यात्म्यांनी चारही युगांत अनेक जन्म प्राप्त केल्याने त्यांना आपल्या देवत्वपदाची विस्मृती झालेली असते. ह्या विस्मृतीमुळे त्यांची ही बुद्धी लोहाप्रमाणे काळी व भ्रष्ट झालेली असते. परंतु त्यांच्या बुद्धीला परमात्म ज्ञानरुपी परिसाचा स्पर्श होताच आदि अनादि स्मृती जागृत होऊन त्यांची बुद्धी सुवर्णाप्रमाणे चमकदार बनते. **परमात्म ज्ञानाचा प्रकाश बुद्धीत आल्याने त्यांच्या बुद्धीचा हाच निर्णय होतो की, परमात्म्याचा हा सत्संग आत्म्याने अंतिम श्वासापर्यंत स्वीकारला पाहिजे. असे अंतःकरणापासून समर्पण होणाऱ्या आत्म्यांना नरापासून श्री नारायण व नारीपासून श्री लक्ष्मी बनण्याचे महान लक्ष्य परमात्मा प्रदान करतो.** फलस्वरुप ते प्रतिदिन परमात्म ज्ञान श्रवण करण्यासाठी ब्रह्माकुमारी विद्यालयात आपली हजेरी लावतात. वर्तमान समयी व भविष्यात अधिक विकर्मे होऊ नयेत. म्हणून तो त्यांना साकारी, आकारी व निराकारी ह्या तीन विधींचा राजयोग शिकवितो. राजयोगाद्वारे जन्मजन्मांतराची विकर्मे भस्म होऊन, पाच तत्त्वांनाही सत्त्वप्रधान बनविण्यासाठी योगदान दिले जाते. जे साधक सत्ययुगासाठी दैवी गुण, दैवी संस्कृति व दैवी आचरणाचे संस्कार आत्म्यात धारण करतात, तेच वास्तविक ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी आहेत. असे ब्रह्मावत्सच सत्ययुग व त्रेतायुगात आपले जन्म व दैवीपद पुरुषार्थानुसार क्रमवार प्राप्त करतात. अशाप्रकारे परमात्म्याची सत्ययुग स्थापना करण्याची विधी पूर्णतः अचूक, यथार्थ व न्यायपूर्ण आहे. ही विधी जाणल्यानंतर विवेकशील आत्म्याचा हाच विवेक जागृत होतो की, एकमात्र परमात्म्याची सत्ययुग स्थापनेची जी एकमात्र विधी आहे, त्या विधीशिवाय अन्य कोणतीही विधी यथार्थ असूच शकत नाही. सत्ययुगाच्या स्थापनेबरोबरच परमात्मा सत्ययुगाला आवश्यक असलेल्या एका सत्यधर्माची स्थापना संगमयुगावरच करतो. त्यासाठी त्याला अन्य धर्मांचा विनाश करण्याची आवश्यकताच नसते. कारण सत्ययुग, त्रेतायुगात परमात्म्याने स्थापन केलेल्या एका सत्यधर्माचे अर्थात आदि सनातन देवी देवता धर्माचेच अस्तित्व असते.

**कलियुगाच्या महाविनाशानंतर सत्ययुगाचा आरंभ होतो तो लक्ष्मी नारायणाच्या राज्यभिषेक सोहळ्याने! मनुष्यमतानुसार श्रीनारायणाचे अस्तित्व हे आकाश तत्वाच्या पार असलेल्या स्वर्गात आहे. परंतु त्यांचे अस्तित्व ह्या काल्पनिक स्वर्गात नसून त्यांनी ह्याच भारतात दैवी प्रजेवर पाच हजार वर्षापूर्वी राज्य केले होते.** परंतु कालचक्राच्या प्रवाहात ह्या स्वर्गीय युगाचा सुवर्ण इतिहास पूर्णतः लोप पावला आहे. यथा राजाराणी तथा प्रजा ह्या सिद्धांताप्रमाणे तेथील दैवी प्रजेची आत्मिक स्थिती ही पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पवित्रतेच्या सोळा कलांनी संपन्न असल्याने त्यांचे आचरणही सत्वप्रधान असते. बंधुनो, 'सत्ययुग' ह्या नावावरुनच स्पष्ट होते की या युगातील दैवी मनुष्य हा सत्यधर्माप्रमाणे आचरण करणारा होता. ह्याच कल्पातील सत्ययुगात प्रथमतः श्री लक्ष्मीनारायण व त्यांच्या सात वंशावलींनी भारतात निर्विघ्नपणे राज्य केले. परिवर्तन होणे हा मनुष्यसृष्टीचा नियम असल्याने सत्ययुगाची १२५० वर्षे समाप्त झाल्यावर त्रेतायुगाचा आरंभ होतो. त्रेतायुगाच्या १२५० वर्षात श्रीराम व श्री सीतासहित बारा वंशावलींनी सत्ययुगाप्रमाणे निर्विघ्न राज्य केले. त्रेतायुगाच्या आरंभीच देवात्म्यांच्या पवित्रतेच्या दोन कला कमी झाल्याने त्यांची आत्मिक स्थिती सतोगुणी असते. अशा ह्या दोन दैवी युगांच्या २५०० वर्षांच्या इतिहासात देवीदेवतांचे आचरण मनोविकार मुक्त, विघ्नमुक्त, कलह मुक्त, हिंसामुक्त व मतमतांतर मुक्त अर्थात श्रेष्ठ होते. ह्या स्वर्गीय वैभवशाली सुवर्ण व रजत इतिहासाचे ज्ञान भारतातील इतिहास तज्ज्ञांनाही ज्ञात नाही. फलस्वरुप श्रीराम व श्रीकृष्ण ह्यांच्या जीवनाविषयी लिहिलेल्या कथांना 'पुराण कथा' अवश्य म्हणता येईल. परंतु हा त्यांचा इतिहास नव्हे! ह्या दोन युगातील आपले पूर्वज कामक्रोधादि मनोविकारांनी मुक्त अर्थात संपूर्ण निर्विकारी होते. अर्थात तेथे भोगबलाने नव्हे तर योगबलाद्वारे

गर्भधारणा होते. बंधुनो, ज्याप्रमाणे टेस्ट ट्यूब बेबीची अशक्य वाटणारी निर्मिती शक्य झाली. तद्वतच दैवी युगात योगबलाद्वारे दैवी संतान कसे प्राप्त होईल ह्यासाठी राजयोगी डॉक्टरांनी आपले विचार अवश्य प्रस्तुत करावेत. **योगबलाद्वारे गर्भधारणा होणे, हेच दैवी युगातील दैवी देवतांच्या कर्मबंधनमुक्त व पवित्र गृहस्थधर्माचे गुह्यरहस्य आहे. श्रीकृष्णाच्या सुवर्ण मुगुटातील मोरपीस हे त्याच्या संपूर्ण पवित्रतेचे प्रतीक आहे** त्या सत्ययुगी स्वर्गात असा कोणी कोणाला उपदेश करणार नाही की, कामविकार नरकाचे द्वार आहे. फलस्वरुप सत्ययुग, त्रेतायुगात संपूर्ण पावन व श्रेष्ठाचारी असलेल्या पवित्र गृहस्थीचा, सुवर्ण महालाचा, लक्ष्मी प्रमाणे पवित्र असलेल्या दैवी पत्नीचा व संततीचा त्याग करून तेथे कोणालाही संन्यास घेण्याची आवश्यकता नसते. भोगबलाचे कर्म अर्थात भ्रष्टाचार व योगबलाचे कर्म अर्थात श्रेष्ठाचार होय! कलियुगात भ्रष्टाचाराने 'जन्म' होत असल्याने म्हटले जाते की, 'झूठी माया, झूठी काया, झूठा है सब संसार! परंतु सत्ययुगासाठी असे म्हणता येईल की वहाँ होती नही है माया, योगबलसे मिलती है सभी को सच्ची काया, कितना सच्चा था वह मनभावन दैवी स्वर्गीय संसार! **बंधुनो, कलियुगी मानव व सत्ययुगी मानव ह्या दोघांची वास्तविकता समजल्यानंतर हे जाणवते की दोघांच्या आचरणात जमीन आस्मानाचे अंतर आहे.** अशा प्रकारे देवी देवतांच्या पवित्र जन्मांचे, त्यांच्या निर्विघ्न जीवनाचे व श्रेष्ठ आचरणाचे स्पष्ट ज्ञान केवळ परमात्माच देऊ शकतो. देवी देवतांचे शरीर व आत्मा दोन्हीही पवित्र असल्याने आजही मंदिरामंदिरात व घराघरातील देवघरात त्यांच्या मूर्तींचे गायन व पूजन केले जात आहे. श्री सत्यनारायणाचे तर खास पूजन केले जाते. परंतु त्यांच्या जीवनाची ही वास्तविकता मनुष्याला ज्ञात नव्हती की, त्याच्या आचरणात श्रेष्ठता, पवित्रता व सत्यता होती. ह्या असत्य युगात सांगितली जाणारी सत्यनारायणाची कथा पूर्णतः असत्य व विवेकशून्य आहे. म्हणून तर परमात्म्याच्या सत्य (श्री) मतानुसार सत्यनारायणाच्या जीवनाची व त्याच्या ८४ व्या जन्मांची सत्यता स्पष्ट होण्यासाठी ह्या विद्यालयाने 'सत्यनारायणाची सत्यकथा' हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. सत्यनारायणाच्या ह्या अद्वैत राज्यात एक धर्म, एक भाषा व एकच सूर्यवंशी कुल होते. तसेच तेथील सर्व देवात्म्यांच्या विचारातही एकता होती.

बंधुनो, मनुष्यसृष्टीचा हा अटल नियम आहे की, ह्या विश्वातील एकता कालांतराने समाप्त होऊन अनेकता निर्माण होत असते. त्रेतायुगाच्या समाप्तीनंतर (तब्बल २५०० वर्षांनी) सर्व प्रकारची एकता समाप्त होऊन ह्या विश्वात अनेक देश, अनेक राज्ये, अनेक धर्म व अनेक भाषा निर्माण होऊ लागल्याने थोड्या फार प्रमाणात संघर्ष व कलह निर्माण होऊ लागतात. बंधुनो ज्यावेळी विश्वात एकता, पवित्रता, सदाचार व सुखशांती असते त्यावेळी कोणताही अशुभ (अनुचित) समाचार निर्माणच होत नाही. **चारही युगांचे सिंहावलोकन केले असता, ह्या विश्वातील अग्रस्थानी असलेला कल्पनातीत व अनाकलनीय अशुभ समाचार हाच होता की द्वापरयुगाच्या आरंभी स्त्री-पुरुषांच्या मनामनात दशमुखी रावणाने प्रवेश केला आहे.** ह्या दशमुखी रावणाने हिंसक इतिहास निर्माण केल्याने, कित्येक राज्ये लयास गेली व कित्येक राज्ये उदयास आली. परराज्याचा लोभ व पर राज्यातील परस्त्रीच्या आकर्षणामुळे कित्येक युद्धे केली गेली. पृथ्वीराज चौहान व संयोगिता ह्यांची प्रेमकहाणी इतिहासात नोंदली गेली आहे. इंग्रजांना भारताचा व भारतातील संपत्तीचा लोभ निर्माण झाल्याने त्यांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. भारताचा सर्वाधिक इतिहास तर ह्या पारतंत्र्यातील डबल गुलामीच्या व सिंगल स्वातंत्र्य मिळविण्याचा आहे. द्वापरयुगापासून कलियुगाच्या अंतिम चरणापर्यंत ह्या रावणाने देशा देशात, धर्माधर्मात व घराघरात कलह व युद्धे घडवून आणली आहेत. द्वापर युगापासूनच दैवी युगातील दैवी गुण व आत्माभिमानी स्थिती प्रायः लोप पाऊन देहाभिमान नावाचा सर्वात खोटा अभिमान निर्माण होऊ लागतो. देहाभिमान हाच आत्म्याला भ्रष्टाचारी व पतित बनविणाऱ्या कामक्रोधादि पाच

विकारांचे मूळ असल्याने ह्या मूळाला अल्पावधीच पाच विषारी पाने फुटतात. ह्या द्वापर युगात कामविकारावर अंकुश राहण्यासाठी ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, संन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रम ह्या चार आश्रमांची मर्यादा असल्याने हा विकार अल्प प्रमाणात असतो. बंधुनो, माया नसलेल्या युगात पवित्र राहणे ह्यात काही विशेषता नाही. परंतु चार आश्रमांच्या मर्यादाद्वारे मायेला लगाम घालणारा द्वापर युगातील मनुष्य कौतुकास पात्र आहे. ह्या द्वापर युगात त्रेतायुगातील देवात्मेही साधारण मनुष्य जन्म प्राप्त करतात. फलस्वरुप जे देवात्मे पवित्र व पूजन योग्य होते तेच विकाराधीन झाल्याने पतित पुजारी बनतात. ह्या पुजाऱ्यांना सतोगुणी देवतांच्याप्रमाणे आचरण करणे अशक्य झाल्याने देवी देवता धर्मांचे 'हिंदूधर्म' असे नामांतर केले जाते. **द्वापर युगापासून मनुष्यात्मे रजोगुणी झाल्याने विकर्मांचा आरंभ होऊन त्यांचे आचरणही रजोगुणी होते. देहाभिमान व देहाचे आकर्षण हेच मनुष्यात्म्यांच्या पतनाचे प्रमुख कारण आहे.**

(क्रमशः)

***

## आध्यात्मिक होळी साजरी करु या –

दरवर्षी केवळ लाकडांची होळी पेटवून तसेच एकमेकांवर रंगांची उधळण करून स्वपरिवर्तन व सृष्टी परिवर्तन कधीच होणार नाही. वास्तविक कलियुगाचे अंती, संगमयुगात सृष्टीला पावन बनविण्याचे जे दिव्य कर्तव्य, पतितपावन शिव परमात्मा करतात, त्याचे यादगार पर्व होळी हा सण आहे. कसे ते पाहू. आपण हे जाणतो की माघ वद्य चतुर्दशीला महाशिवरात्रीचे परम पावन पर्व साजरे केले जाते. हे पर्व शिव परमात्मयाच्या दिव्य अवतरणाचे यादगार पर्व आहे. कलियुगाचे अंती शिव परमात्मा सृष्टीवर अवतरित होऊन, प्रजापिता ब्रह्मा यांच्या साकार माध्यमाद्वारे आपल्याला राजयोग शिकवितात. **त्याच्या अभ्यासाने आपण १६ कला संपन्न व संपूर्ण निर्विकारी अर्थात पवित्र बनतो. त्यामुळेच महाशिवरात्रीनंतर बरोबर १६ दिवसांनी फाल्गुन पौर्णिमेला होळीचा सण साजरा केला जातो कारण होळी अर्थात 'होली' (Holy) अर्थात पवित्र होय.**

होळीच्या सणात एकमेकाच्या अंगावर रंग उधळतात. परंतु आध्यात्मिक दृष्ट्या तो रंग आहे ज्ञानाचा. **वर्तमान संगमयुगात मानवाने ईश्वरीय ज्ञान रंगाद्वारे प्रथम स्वतः रंगले पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्यातील कुसंस्काररुपी लाकडाची होळी करून पवित्र बनले पाहिजे. अशी ही अलौकिक आध्यात्मिक होळी साजरी करण्यासाठी, आपल्या जवळच्या ब्रह्माकुमारीज् सेंटरला अवश्य भेट द्या.**

***


## प्रपत्र ४ : अमृतकुंभ द्वैमासिकाविषयीचे निवेदन

१) प्रकाशन स्थळ : प्रजापिता ब्रह्माकुरीज् लाईट हाऊस वागळे इस्टेट, ठाणे (प.) ४००६०४

२) प्रकाशनाचा अवधी – द्वैमासिक

३) मुद्राकाचे नाव – बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
मुद्रणस्थळाचा पत्ता : परफेक्ट प्रिंटस्, २२, इंडस्ट्रियल इस्टेट, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे (प.) ४००६०१

४) प्रकाशकाचे नाव : बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पू)-४००६०३

५) संपादकाचे नाव : बी. के. शिवाजी चौधरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : सी-२ वनविहार हौसिंग सोसायटी, कोपरी, ठाणे (पू) ४००६०३ महाराष्ट्र

६) मालकाचे नाव व पत्ता : प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय, माऊंट आबू (राजस्थान)

मी बी. के. गोदावरी, असे प्रमाणित करते की माझ्या ज्ञानानुसार वरील माहिती सत्य आहे

**(बी. के. गोदावरी) प्रकाशक, अमृतकुंभ**



पूर्णा (परभणी) : 'अलविदा तणाव' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना नगराध्यक्ष श्री. संतोष एकलारे, ब्र. कु. अर्चना दीदी व अन्य




जयसिंगपूर (सातारा) : घोडावत विद्यापीठाचे चेअरमन श्री. संजय घोडावत यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. शिवानी बहेन, ब्र. कु. रुक्मिनी बहेन व अन्य मान्यवर



उस्मानाबाद : माहेश्वरी प्रदेशाध्यक्ष श्री. भनसाली व श्री. मिनियार यांचा सत्कार करतांना ब्र. कु. ज्योति बहेन



पुणे (रविवार पेठ) : 'मेरा भारत, हरित भारत' या योजने अंतर्गत विशेष कार्य केल्याने ब्र. कु. रोहिणी बहेन यांना पारितोषिक देतांना राजयोगिनी संतोष दीदी




वाशी : 'व्यसनविरोधी–जन जागरण' कार्यक्रमांत ग्रुप फोटोत ब्र. कु. शीला दीदी व श्री. एकनाथ तम्बवेकर




शिर्डी : 'तणावमुक्त जीवन' कार्यक्रमानंतर ग्रुप फोटोत CISF चे जवान व अधिकारी, ब्र. कु. डॉ. सचिन परब, ब्र. कु. भारती व पद्मा बहेन



चंदन नगर (पुणे) : राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्थान मधील वर्कशॉपनंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. अंजली व अनिता बहेन



बांबवडे (कोल्हापूर): ग्रामीण पदाधिकारी स्नेहमीलन कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना जि.प. व पंचायत समितीचे अधिकारी, ब्र. कु. सरला दीदी, सुनंदा दीदी, संगीता बहेन व दशरथ भाई

Registration No. : MAHMAR/2007/21914



शांतिवन (आबू रोड) : भारताचे राष्ट्रपती महामहिम भ्राता रामनाथ कोविंद व श्रीमती सविता कोविंद यांना आशीर्वाद देतांना संस्थेच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी जानकीजी, सोबत अन्य मान्यवर



पांडव भवन (मा.आबू) : पिताश्री ब्रह्माबाबांच्या ५१ व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतांना विशाल ब्राह्मण परिवार



पणजी (गोवा) : राज्यपाल मा. श्री. सत्यपाल मलिक व मुख्यमंत्री मा. श्री. प्रमोद सावंत यांच्याशी ज्ञानचर्चा करतांना ब्र. कु. शोभा बहेन व निर्मला बहेन




गोवा (डोना पॉला) : ब्र. कु. डॉ. दीपक हरके व ब्र. कु. सुवर्णा बहेन यांना 'इंटरनॅशनल ग्लोरी ॲवॉर्ड' प्रदान करतांना सुप्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षित.